सांध्य दैनिक

# विदर्भ प्रजासत्ताक

https://epaper.vidarbhaprajasattak.com E-Mail : prajasattaknews24@gmail.com RNI No. - MAHMAR 2023/84526 Postel Regi. No. - AMT/RNP 546/2024-2026

❑ वर्ष - ३ रे ❑ अंक - १२० वा ❑ अमरावती (महाराष्ट्र) ❑ मंगळवार दि. ३ जून २०२५ ❑ संपादक - शुभांगी जोशी ❑ मुल्य - १ रु. ❑ पृष्ठ -६

## पाकिस्तानचा आणखी एक पर्दाफाश भारताकडून २० नव्हे तर तब्बल २८ ठिकाणे उद्ध्वस्त

**विदर्भ प्रजासत्ताक दि.३लाहोर**




ऑपरेशन सिंदूरच्या माध्यमातून भारताने पाकिस्तानमधील दहशतवाद्यांचे अड्डे नेमकेपणाने उद्ध्वस्त करत जगभरात आपली लष्करी ताकद दाखवून दिली आहे. प्रारंभी भारताकडून केवळ दहशतवादी ठिकाणांना लक्ष्य करण्यात आले असले, तरी पाकिस्तानकडून भारतीय लष्करी तळांवर हल्ल्याचा प्रयत्न झाल्यानंतर भारताने तितक्याच तीव्रतेने प्रत्युत्तर दिले. यावेळी पाकिस्तानने आपली हानी झाली नसल्याचा दावा केला होता. मात्र आता त्यांच्या स्वतःच्या दस्तऐवजांमधूनच भारताने केलेल्या कारवाईची माहिती उघड झाली आहे.

पाकिस्तानच्या ऑपरेशन बन्यान अन मार्कोसवरील कागदपत्रात असे म्हटले आहे की, भारताने नमूद केलेल्या तळांपेक्षा ८ अधिक तळांवर हल्ला करण्यात आला. गेल्या महिन्यात झालेल्या हवाई हल्ल्यानंतर पत्रकार परिषदेत भारतीय हवाई दलाने या ठिकाणांची नावे घेतली नाहीत. म्हणजेच भारताने २० नव्हे तर २८ ठिकाणी हल्ले केले होते. पाकिस्तानच्या कागदपत्रात हे देखील नमूद करण्यात आले आहे की, भारताने या हल्ल्यांमध्ये लांब पल्ल्याच्या क्षेपणास्त्रांचा वापर केला होता. यामुळेच पाकिस्तानच्या संरक्षण यंत्रणांमध्ये एकच खळबळ उडाली होती. हे क्षेपणास्त्र टप्प्यातील लक्ष्यांवर अत्यंत अचूकपणे घाव घालू शकतात, हे या कारवाईतून स्पष्ट झाले.

**पाकिस्तानकडून 'या' अतिरिक्त ८ ठिकाणी हल्ला झाल्याची कबुली**

१. पेशावर २. झांग ३. हैदराबाद (सिंध) ४. गुजरात (पंजाब प्रांत) ५. गुजरांवाला ६. बहावलनगर ७. अटक ८. छोर

दरम्यान, या आधी प्रसिद्ध झालेल्या मॅक्सार टेक्नॉलॉजीजच्या उपग्रह छायाचित्रांमध्ये ऑपरेशन सिंदूरदरम्यान भारताने केलेल्या अचूक हल्ल्यांमुळे झालेल्या नुकसानीचे स्पष्ट चित्र समोर आले होते. त्यानुसार जैश-ए-मोहम्मदच्या बहावलपूर येथील मुख्यालयावर आणि लष्कर-ए-तैयबाच्या मुरीदके येथील प्रशिक्षण केंद्रावर हल्ले करण्यात आले होते. याशिवाय पीओकेमधील मुझफ्फराबाद, कोटली, रावलकोट, चकस्वरी, भिंबर, नीलम व्हॅली, झेलम आणि चकवाल येथेही भारताने लक्ष्य केले होते.

## पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना आश्वासनांची आठवण करून देण्यासाठी काँग्रेसची शेतकरी आत्मसन्मान पदयात्रा

**विदर्भ प्रजासत्ताक दि.३यवतमाळ**

२०१४ च्या लोकसभा निवडणुकीपूर्वी भाजपाचे पंतप्रधान पदाचे उमेदवार म्हणून नरेंद्र मोदी यांनी आर्णी तालुक्यातील दाभडी गावात 'चाय पे चर्चा' हा इव्हेंट घेतला. यावेळी त्यांनी भाजप सत्तेत आल्यास शेतकऱ्यांना कर्जमुक्त करण्यासोबतच हमीभावासह अनेक आश्वासने दिली. प्रत्यक्षात भाजपची सत्ता आल्यानंतर गेल्या ११ वर्षांत यातील एकही आश्वासन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी पूर्ण केले नाही. त्यांना या आश्वासनांची पूर्तता करण्याची आठवण करून देण्यासाठीच काँग्रेसने दाभडी येथे शेतकरी आत्मसन्मान पदयात्रेचे आयोजन केले, असे प्रतिपादन काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी केले.

आर्णी तालुक्यातील दाभडी येथे काँग्रेसच्या वतीने आज मंगळवारी शेतकरी सन्मान पदयात्रेत प्रमुख अतिथी म्हणून ते बोलत होते. यावेळी चंद्रपूर-आर्णीच्या खासदार प्रतिभा धानोरकर, माजी प्रदेशाध्यक्ष माणिकराव ठाकरे, माजी मंत्री



शिवाजीराव मोघे, प्रा. वसंत पूरके, महिला प्रदेशाध्यक्ष संध्या सव्वालाखे, जिल्हा काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष प्रफुल्ल मानकर, जिल्हा बँकेचे अध्यक्ष मनीष पाटील आदी उपस्थित होते. दाभडी येथील पुरातन ओंकारेश्वर मंदिरातून या पदयात्रेस प्रारंभ झाला. पदयात्रेत असंख्य काँग्रेस कार्यकर्त्यांसह पदाधिकारी, नेते व सामान्य नागरिक सहभागी झाले होते. दाभडी येथून निघालेली ही पदयात्रा १० किलोमीटरवर असलेल्या आर्णी येथे पोहोचणार आहे. येथे कृषी उत्पन्न बाजार समितीच्या आवारात या पदयात्रेचा समारोप आणि शेतकरी मेळावा होणार आहे.

## 'सर्व जगाला सांगता, पण संसदेला नाही', ऑपरेशन सिंदूरबाबत १६ विरोधी पक्षांचे पंतप्रधान मोदींना पत्र

### विरोधी पक्षांनी संसदेचे विशेष अधिवेशन बोलावण्याची केली मागणी

**विदर्भ प्रजासत्ताक दि.३नवी दिल्ली**



पहलगाम हल्ल्यानंतर भारताने ऑपरेश सिंदूरद्वारे पाकस्तानातील अनेक दहशतवादी अड्डे उद्ध्वस्त केले. सरकारच्या या कारवाईबाबत देशभरातून कौतुक होत आहे. मात्र, या ऑपरेशनबाबत सरकार पारदर्शक नसल्याचा आरोप करत विरोधी पक्षांनी संसदेचे विशेष अधिवेशन बोलावण्याची मागणी तीव्र केली आहे. याच पार्श्वभूमीवर आज (३ जून) दिल्लीतील कॉन्स्टिटयूशन क्लबमध्ये ख.छ.ऊ.ख.- आघाडीच्या प्रमुख नेत्यांची बैठक बोलावण्यात आली.

जयराम रमेश, संजय राऊत, राम गोपाल यादव, मनोज झा, डेरेक ओ'ब्रायन हे कॉन्स्टिटयूशन क्लबमध्ये पोहोचले होते. या बैठकीनंतर १६ विरोधी पक्षांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना पत्र लिहून संसदेचे विशेष अधिवेशन बोलावण्याची मागणी केली आहे. या पत्रात पहलगाम, पूंछ, उरी, राजौरी येथील दहशतवादी हल्ले आणि भारत-पाक संघर्ष यासारख्या संवेदनशील मुद्द्यांवर संसदेत मुक्त चर्चेबद्दल चर्चा करण्यात आली आहे.

तृणमूल काँग्रेसचे खासदार डेरेक ओ'ब्रायन यांनी मीडियाशी संवाद साधताना म्हटले की, १६ विरोधी पक्षांनी पंतप्रधानांना पत्र लिहून संसदेचे विशेष अधिवेशन बोलावण्याची मागणी केली आहे. सरकार संसदेला जबाबदार आहे आणि संसद जनतेला जबाबदार आहे. सर्व विरोधकांना वाटते की, केंद्र सरकारने केवळ आंतरराष्ट्रीय व्यासपीठांवर विधाने करू नयेत, तर संसदेतदेखील संवाद साधावा.

**या पक्षांनी केली अधिवेशन बोलावण्याची मागणी**

पत्रावर स्वाक्षरी करणाऱ्या पक्षांमध्ये काँग्रेस, समाजवादी पक्ष, तृणमूल काँग्रेस, द्रमुक, शिवसेना (उद्धव गट), राजद, नॅशनल कॉन्फरन्स, सीपीआय (एम), सीपीआय, आययूएमएल, आरएसपी, जेएमएम, व्हीसीके, केरळ काँग्रेस, एमडीएमके आणि कम्युनिस्ट पार्टी ऑफ इंडिया (मार्क्सवादी-लेनिनवादी) लिबरेशन यांचा समावेश आहे.

## संजय राऊत जवळ असताना उद्धव ठाकरेंना अन्य शत्रूची गरज नाही, मंत्री महाजनांचा टोला

**विदर्भ प्रजासत्ताक दि.३मुंबई**



भाजप नेते व जलसंपदा मंत्री गिरीश महाजन यांनी उबाठा खासदार संजय राऊत यांच्यावर घणाघाती टीका केली आहे. संजय राऊत यांच्या दलालीमुळे उद्धव ठाकरे संपले असा आरोप गिरीश महाजन यांनी केला आहे. राऊतांनी ठाकरेंची शिवसेना शरद पवार आणि काँग्रेसच्या मांडीवर बसवली. त्यात जी दलाली तुम्ही केली तेवढी आजपर्यंत कुणी केली नसेल अशी टीका महाजन यांनी राऊत यांच्यावर केली आहे.

गिरीश महाजन पुढे म्हणाले, उद्धव ठाकरेंना त्यांचा पक्ष संपवण्यासाठी कोणत्याही राजकीय शत्रूची गरज नाही, कारण संजय राऊत हे एकटेच त्यासाठी पुरेसे आहेत. नाशिकमध्ये सुधाकर बडगुजरच नाही तर अनेकजण नाराज आहेत. आता जिल्ह्यात कुणीच उबाठा पक्षात राहण्यास तयार नाही. संजय राऊत जोपर्यंत पक्षात आहे, तोपर्यंत उद्धव ठाकरेंना अन्य शत्रूची गरजच नाही. कारण तेच पक्ष फोडण्याचं काम करत असल्याचा आरोप महाजन यांनी केला. राऊतसारख्या दलालांमुळे शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) गटातील अनेक नेते आणि कार्यकर्ते पक्ष सोडून गेल्याचे महाजन म्हणाले.

संजय राऊत यांना शिवसेना संपवायची होती म्हणूनच त्यांनी शिवसेनेला काँग्रेस व शरद पवार यांच्या दावणीला बांधलं. बाळासाहेबांचे हिंदुत्वाचे सगळे विचार संपवले. राऊतांची बडबड बंद झाली नाही तर शिवसेना शिल्लकच राहणार नाही, उद्धवजींचं देवच भलं करो असं महाजन म्हणाले.

## लग्न सोहळ्याच्या आडून शिंदे-फडणवीसांनी सोडले बाण, उद्धव ठाकरे घायाळ

**विदर्भ प्रजासत्ताक दि.३नाशिक**



आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी काल नाशिकमध्ये खेळलेल्या खेळीमुळे उद्धव ठाकरे यांच्या पक्षाला मोठा धक्का बसला आहे.

उबाठा गटाचे महानगरप्रमुख विलास शिंदे यांच्या मुलीच्या लग्नसोहळ्याच्या निमित्ताने उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी हजेरी लावली. तर दुसरीकडे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे त्यांचे पुतणे आणि माजी आमदार शोभा फडणवीस यांचे नातू तन्मय फडणवीस यांच्या विवाह सोहळ्यासाठी नाशिकमध्ये असताना, उबाठाचे उपनेते सुधाकर बडगुजर यांनी त्यांची भेट घेतली. त्यामुळे शिंदे-फडणवीसांच्या जोडीने हे दोन्ही नेते आपल्या गळाला लावल्याची चर्चा राजकीय वर्तुळात आहे.

शिंदे फडणवीस यांच्या जोडीने नाशिकमध्ये उद्धव ठाकरे यांचे टेन्शन वाढवले आहे. विलास शिंदे हे शिवसेनेचे जुने कार्यकर्ते आहेत. शिवसेना फुटल्यानंतर ते उद्धव ठाकरे यांच्या गटासोबत राहीले. महानगरप्रमुख पदाची जबाबदारी उद्धव ठाकरेंनी त्यांच्यावर सोपवली.तर, बडगुजर यांचा सर्वाधिक संघर्ष भाजपशी झाला असून, एका गुन्ह्याच्या प्रकरणात बडगुजर कुटुंबीयाचे आलेले नाव व उबाठामध्ये संघटनात्मक पातळीवर झालेल्या बदलामुळे बडगुजर अस्वस्थ होते. त्यामुळे तेही अन्य पक्षात प्रवेश करणार असल्याची चर्चा होती. मात्र शिवसेना ठाकरे गटाच्या उपनेते पदी त्यांची नियुक्ती झाल्यानंतर बडगुजर यांच्या पक्षांतराच्या चर्चांना ब्रेक लागला होता.

मात्र काल घडलेल्या घडामोडींमुळे विलास शिंदे व सुधाकर बडगुजर या दोघांच्या पक्षांतराच्या चर्चा सुरु झाल्या आहेत. यासंदर्भात दोघांना विचारले असता महापालिकेतील प्रलंबित प्रश्नांसदर्भात मुख्यमंत्र्यांची आपण भेट घेतल्याचे बडगुजरांनी सांगितले तर विलास शिंदे यांनी राजकारणापलीकडे देखील संबंध असू शकतात असे सांगून स्पष्ट बोलण्याचे टाळले.


## चारित्र्यावर संशय, तलवारीने वार करून पतीने केली पत्नीची हत्या

**विदर्भ प्रजासत्ताक दि.३यवतमाळ**

पत्नीच्या चारित्र्यावर संशय घेत पतीने पत्नीची तलवारीने हत्या केली. ही घटना मंगळवारी ३ जून रोजी पहाटे ४:३० वाजताच्या सुमारास वडगाव जंगल पोलिस ठाणेअंतर्गत यावली (कारेगाव) येथे घडली. वडील आईवर तलवारीने हल्ला करत आहेत, हे पाहून मुलगा आईच्या बचावासाठी धावला. त्याने वडिलांचा प्रतिकार केला असता त्यात आरोपी वडील खाटेवर पडून गंभीर जखमी झाले. त्याला यवतमाळ शासकीय रुग्णालयात दाखल केले आहे. बेबीबाई दलुराम राठोड (५६), असे मृत महिलेचे नाव आहे. तर दलुराम गुलाब राठोड (५९), असे आरोपीचे नाव आहे. दलुराम हा संशयी प्रवृत्तीचा होता. यातूनच त्याने मंगळवारी पहाटे बेबीबाईसोबत वाद घातला. घरातील तलवार काढून बेबीबाईवर वार केला.

## राज्यात इयत्ता पहिलीपासूनच लष्करी प्रशिक्षण, शिक्षणमंत्री दादा भुसेंची घोषणा

**विदर्भ प्रजासत्ताक दि.३नाशिक**



महाराष्ट्र शाळांमध्ये इयत्ता पहिलीपासूनच लष्करी प्रशिक्षण दिले जाणार, अशी घोषणा राज्याचे शालेय शिक्षण मंत्री दादा भुसे यांनी केली. मुलांमध्ये देशभक्ती, राष्ट्रनिष्ठा, शिस्त, व्यायाम आणि संघटितपणाची भावना रुजविण्यासाठी राज्यातील शाळांमध्ये मुलांना लष्करी प्रशिक्षण दिले जाईल, यासाठी निवृत्त सैनिकांची मदत घेतली जाईल, असेही त्यांनी म्हटले.

राज्यातील शाळांमध्ये इयत्ता पहिलीपासूनच लष्करी प्रशिक्षण देण्याचा निर्णय घेण्यात आला. लहानपणापासून मुलांमध्ये देशभक्तीची भावना निर्माण व्हावी, नियमित शारीरिक व्यायामाची सवय आणि शिस्त लागावी, असे यामागचा उद्देश आहे. यामुळे विद्यार्थ्यांना भविष्यात नक्कीच फायदा होईल. माजी सैनिक, क्रीडा शिक्षक, राष्ट्रीय कॅडेट कोर म्हणजेच एनसीसी स्काऊट गाईड्स हे विद्यार्थ्यांना हे लष्करी प्रशिक्षण देतील. त्यासाठी राज्यातील २.५ लाख माजी सैनिकांची मदत घेतली जाणार आहे.

शालेय शिक्षण आणि माजी सैनिक कल्याण विभागाच्या बैठकीत पहिली ते इयत्ता बारावी पर्यंतच्या विद्यार्थ्यांना लष्करी प्रशिक्षण देण्याचा निर्णय राज्य सरकारच्यावतीने घेण्यात आला. महिन्याच्या शेवटच्या शनिवारी हे प्रशिक्षण देण्यात येणार आहे. या प्रशिक्षणातून विद्यार्थ्यांमध्ये देशभक्ती, राष्ट्रनिष्ठा, स्वतःच्या शरिराची काळजी घेणे, व्यायाम आणि शिस्त असे चांगले परिणाम समोर येतील, असा विश्वासही भुसे यांनी व्यक्त केला.

## बकरी ईद निमीत्त मनपा आयुक्त सचिन कलंत्रे यांनी घेतली आढावा बैठक

**विदर्भ प्रजासत्ताक दि.३अमरावती**

महानगरपालिका अमरावती पशुवैद्यकीय विभागा अंतर्गत दि. आज ०७/०६/२०२५रोजी मुस्लिम बांधवांचा बकरी ईद हा सण स्वच्छता पुर्ण व पर्यावरण पुरक सादर करण्याकरीता आयुक्त सचिन कलंत्रे यांच्या अध्यक्षतेखाली बैठकीचे आयोजन केले होते. त्या करीता मा . पोलिस उपआयुक्त गणेश शिंदे व सर्व पोलिस स्टेशन चे सर्व पोलिस निरीक्षक , मनपा उपायुक्त डॉ. मेघना वासनकर, कार्यकारी अभियंता रविंद्र पवार, पशुवैद्यकीय डॉ. सचिन बोंद्रे ,स्वास्थ अधिक्षक श्रीकांत डवरे , ज्येष्ठ स्वास्थ निरीक्षक, स्वास्थनिरीक्षक व इतर कर्मचारी उपस्थित होते सदर बैठकीमध्ये स्वच्छता , पाणी व कुर्बानी केल्यानंतर वेस्ट मटेरियल टाकण्याकरीता प्रत्येक मस्जिद मध्ये जाऊन कंम्पोस्टेबल बॅग चे वाटप करणेबाबत मा. आयुक्त यांच्या कडुन आदेश देण्यात आले तसेच मुस्लिम प्रभागामध्ये नविन कंटेनर ठेवण्याचे आदेश मा. आयुक्तांनी दिले तसेच



पशुवैद्यकीय विभागामार्फत विशेष पथकाची नियुक्ती करण्यात आली. सदर बैठकीमध्ये मुस्लिम बांधवांच्या सुचना घेऊन त्यावर उपाययोजना करण्यात येतील याची ग्वाही देण्यात आली.बकरी ईद संदर्भाने सर्व मुस्लिम बांधवांनी महाराष्ट्र प्राणी संरक्षण कायदा व गोवंश हत्या प्रतिबंध कायदा अधिनियमानुसार कुर्बानी करीता जनावरांचा वापर करावा व प्रशासनास सहकार्य करावे.

## संपादकीय ......

# जागतिक महासत्तेला हवंय सुरक्षाकवच

एकविसाव्या शतकात युद्धाचे स्वरूप झपाट्याने बदलत आहे. आता पारंपरिक रणांगणापेक्षा सायबर स्पेस, ड्रोन तंत्रज्ञान आणि हायपरसोनिक क्षेपणास्त्रे हाच आधुनिक युद्धाचा मुख्य भाग बनत आहे. अशावेळी जागतिक महासत्ता असलेल्या अमेरिकेला भविष्यातील या 'हायब्रीड युद्धा'ला सामोरे जाण्यासाठी नव्या तंत्रज्ञानाची गरज भासत आहे. यामुळेच अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी 'गोल्डन डोम' नावाची एक सर्वसमावेशक क्षेपणास्त्र संरक्षण प्रणाली उभारण्याचा घाट घातला आहे.

अमेरिकेच्या संरक्षण यंत्रणेमध्ये महत्त्वपूर्ण पाऊल उचलत, राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी 'गोल्डन डोम' ही क्षेपणास्त्र संरक्षण प्रणाली (मिसाईल डिफेन्स शिल्ड) उभी करण्यास मंजुरी दिली आहे. ही प्रणाली विदेशी क्षेपणास्त्र हल्ल्यांपासून अमेरिकेला वाचण्यासाठी विकसित करण्यात येत आहे. याची एकूण अंदाजित किंमत सुमारे १४ लाख ९६ हजार ७९८ कोटी रुपये इतकी आहे. या प्रणालीमुळे शत्रूच्या आक्रमक क्षेपणास्त्रांना आकाशातच नष्ट करता येणार असून, त्यामुळे अमेरिकेची अंतर्गत सुरक्षा अधिक मजबूत होईल, अशी अपेक्षा आहे. ट्रम्प यांच्या कार्यकाळाच्या अखेरीस म्हणजे २०२९ मध्ये ही संपूर्ण प्रणाली कार्यान्वित होण्याची शक्यता व्यक्त करण्यात आली आहे. या प्रकल्पाच्या अखेरच्या टप्प्यातील संचलनाची जबाबदारी जनरल मायकेल गुट्टलीन यांच्याकडे सोपवली आहे. 'गोल्डन डोम फॉर अमेरिका' या नावाने ओळखली जाणारी ही योजना संरक्षणाच्या क्षेत्रात एक क्रांतिकारी पाऊल मानले जात आहे.

अर्थात, या प्रकल्पाला तांत्रिक व राजकीय आव्हानांचा मोठा सामना करावा लागण्याची शक्यता आहे. तसेच, काही तज्ज्ञांनी यासाठी अपेक्षेपेक्षा अधिक खर्च करावा लागण्याचीही शक्यता वर्तवली आहे. या घोषणेसोबत ट्रम्प यांनी पुन्हा कॅनडाला अमेरिकेचे ५१ वे राज्य बनण्याचा प्रस्ताव दिला आहे. त्यांच्या म्हणण्यानुसार, कॅनडा स्वतंत्र राष्ट्र राहिल्यास 'गोल्डन डोम'मध्ये सहभागी होण्यासाठी त्यांना ६१ अब्ज डॉलरचा खर्च करावा लागेल; पण जर त्यांनी अमेरिकाचा भाग होण्याचा निर्णय घेतला, तर त्यांना एकही डॉलर खर्च करावा लागणार नाही. हा प्रस्ताव त्यांनी त्यांच्या 'ट्रूथ सोशल' नेटवर्कवर पोस्ट करत अधिकृतपणे मांडला आहे. तथापि, कॅनडाच्या अध्यक्षांनी नम्र-पणाने; पण ठाम राहत हा प्रस्ताव फेटाळून लावला आहे.

'गोल्डन डोम' ही प्रणाली इस्रायलच्या 'आयर्न डोम' प्रणालीसारखी असली, तरी अमेरिकेच्या भौगोलिक आणि सामरिक गरजांनुसार ती अधिक विस्तृत आणि प्रगत रूपात साकारली जाणार आहे. ही प्रणाली तीन मुख्य भागांमध्ये विभागलेली आहे. रडार, कमांड पोस्ट आणि लॉन्चर युनिटस्. यापैकी रडार प्रणाली आकाशातील संभाव्य धोक्यांची माहिती मिळवण्यास सक्षम असेल. या प्रणालीला मिळालेली माहिती कमांड पोस्टला दिली जाईल, जी निर्णय घेऊन लॉन्चर युनिटला निर्देश देईल. लॉन्चरमधून मिसाईल्स हवेत सोडली जातील. ही क्षेपणास्त्रे उड्डाणादरम्यानच लक्ष्य शोधून नष्ट करतात. या प्रणालीत मोबाईल आणि स्टॅशनेरी दोन्ही प्रकारचे लॉन्चर आहेत.

अमेरिका या प्रणालीसाठी विविध प्रकारच्या लघू आणि दीर्घ पल्ल्याच्या क्षेपणास्त्रांचा समावेश करणार आहे. तसेच, हायपरसोनिक क्षेपणास्त्रांसाठी खास उपाययोजना, नवीन फ्लेअर्स आणि हत्यारे विकसित केली जातील. सध्या अस्तित्वात असलेल्या 'पॅट्रियट डिफेन्स सिस्टीम' आणि प्रगत रडार तंत्रज्ञानाला एकत्रित करून 'गोल्डन डोम' तयार केला जाणार आहे.अमेरिका आणि कॅनडा यांच्यात नॉर्थ अमेरिकन एरोस्पेस डिफेन्स कमांड अर्थात 'नोरा'च्या माध्यमातून आधीपासूनच सामूहिक संरक्षण सहकार्य आहे. मात्र, ट्रम्प यांचा हा नवीन प्रस्ताव आणि त्यांचे भाष्य कॅनडा-अमेरिका संबंधांमध्ये नव्याने तणाव निर्माण करू शकते. कारण, 'गोल्डन डोम' हा प्रकल्प फक्त संरक्षणात्मक पातळीवर मर्यादित नसून, त्याचा वापर राजकीय हेतूंकरिता, विशेषतः ट्रम्प यांच्या राजकीय अजेंड्यासाठी मोठ्या प्रमाणात होताना दिसत आहे. तथापि, हा प्रकल्प प्रत्यक्षात उतरला तर जगातील कुठल्याही दहशतवादी किंवा शत्रुराष्ट्राच्या नापाक योजनांना अमेरिकेविरुद्ध यश मिळवणे कठीण होईल, हे निश्चित. कारण, या प्रणालीच्या साहाय्याने अमेरिका आजूबाजूला एक अदृश्य संरक्षणकवच उभारणार आहे, ज्याला कोणताही शत्रू भेदू शकणार नाही.इस्रायलची 'आयर्न डोम' ही छोट्या देशांच्या संरक्षणासाठी तयार करण्यात आलेली हवाई संरक्षण प्रणाली आहे. या 'आयर्न डोम'ने २०११ पासून आजवर हजारो लहान अंतराच्या रॉकेटस् आणि इतर क्षेपणास्त्रांचा यशस्वीपणे मुकाबला केला आहे. मात्र, अमेरिका हा देश क्षेत्रफळाच्या दृष्टीने इस्रायलपेक्षा सुमारे ४३० पट मोठा आहे आणि लोकसंख्येच्या दृष्टीने ३० पट मोठा आहे. त्यामुळे इस्रायलप्रमाणे छोट्या आणि ठराविक भागात कार्यरत असलेल्या एअर डिफेन्स सिस्टीमला अमेरिकेसारख्या विशाल देशात प्रत्येक भागात तैनात करणे ही एक मोठी अडचण होती. म्हणूनच अमेरिका ही नवी आणि अधिक व्यापक प्रणाली विकसित करत आहे. 'गोल्डन डोम' ही प्रणाली केवळ छोट्या क्षेपणास्त्रांपासून संरक्षण करत नाही, तर ती लांब पल्ल्याच्या मिसाईल्स, ड्रोन आणि कृत्रिम बुद्धिमत्तेच्या आधारे होणार्या हल्ल्यांपासूनही संरक्षण करू शकते. ही स्पेस-बेस्ड (अवकाशातून चालणारी) मल्टी-लेयर डिफेन्स सिस्टीम आहे. ही प्रणाली लांब पल्ल्याच्या, बॅलिस्टिक आणि हायपरसोनिक मिसाईल्सचा नाश करू शकते.

कोणत्याही दिशेने आलेला धोका ओळखून ३६० डिग्री संरक्षण प्रदान करते. 'गोल्डन डोम' ही प्रणाली अधिक गतिमान, सुस्पष्ट आणि सध्याच्या हवाई धोक्यांना तोंड देण्यासाठी आधुनिक तंत्रज्ञानाने सज्ज आहे. अमेरिका सध्या कोणत्याही मोठ्या युद्धात सहभागी नाहीये. जिथे जिथे अमेरिकेची लष्करी उपस्थिती आहे, तेथील स्थिती पाहिल्यास या सर्व भागात तुलनेने दुर्बल शत्रू आहेत. त्यामुळे त्यांच्याकडून अमेरिकेला मोठे नुकसान पोहोचवले जाण्याच्या शक्यता शून्य आहेत. तरीही ट्रम्प प्रशासनाने ही प्रणाली उभारण्याचा निर्णय भविष्यातील युद्धे आणि विशेषतः इलेक्ट्रॉनिक वॉरफेअर (सायबर व डिजिटल तंत्रज्ञानाच्या आधारे लढले जाणारे युद्धप्रकार) लक्षात घेऊन घेतला आहे. दुसरी गोष्ट अशी की, अमेरिकेने पूर्व किनारा आणि अटलांटिक महासागर परिसरात संभाव्य धोक्यांचा मुकाबला करण्यासाठी 'यूएस फ्लीट फोर्स कमांड'ची तैनाती करून ठेवली आहे.

# मान्सून कालावधीत यंत्रणांनी सज्ज राहावे-जिल्हाधिकारी आशिष येरेकर

## कृती कार्यक्रमांची प्रभावी अंमलबजावणी करावी

**दि.३विदर्भ प्रजासत्ताक**



दि.३ अमरावती, ८येत्या मान्सून कालावधीत एकाही व्यक्तीचा मृत्यू होऊ नये, यासाठी क्षेत्रिय स्तरावरील यंत्रणांनी सज्ज राहावे, तसेच राज्य शासनाच्या १०० दिवस कृती कार्यक्रमाची अंमलबजावणी करावी, असे आवाहन जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांनी दिले.जिल्हाधिकारी कार्यालयात आज मान्सूनपूर्व आढावा आणि कृती कार्यक्रमाच्या अंमलबजावणीचा आढावा घेतला. यावेळी मुख्य कार्यकारी अधिकारी संजिता महापात्र, महापालिका आयुक्त सचिन कलंत्रे, उपविभागीय अधिकारी मिन्नू पी. एम., प्रियंवदा म्हाडदळकर, निवासी उपजिल्हाधिकारी अनिल भटकर, उपजिल्हाधिकारी विवेक जाधव, प्रसेनजित चव्हाण यांच्यासह क्षेत्रिय स्तरावरील अधिकारी दूरदृश्य प्रणालीद्वारे उपस्थित होते.

जिल्हाधिकारी श्री. येरेकर म्हणाले, येत्या मान्सूनच्या कालावधीत सर्व यंत्रणांनी सज्ज राहावे. पूर परिस्थिती उद्भवू शकणाऱ्या गावांमध्ये बाधीत होणाऱ्या नागरिकांची राहण्याची व्यवस्था करावी. बाधीतांना आताच नोटीस देण्यात यावी. पूर परिस्थितीनंतर साथरोग उद्भवत असल्याने आरोग्य यंत्रणांनी सतर्क राहून तातडीने कार्यवाही करावी. तसेच बचाव पथकांच्या बोटी सुस्थितीत आणि वापरात असल्याची खातरजमा करण्यात यावी. पथकांना पुरविण्यात आलेल्या साहित्याची तपासणी करावी. मान्सून कालावधीत जिल्हास्तरावरील नियंत्रण कक्ष २४ तास सुरू राहील. यावर येणाऱ्या दूरध्वनीची नोंद ठेवण्यात यावी.शासनाच्या कृती कार्यक्रमात प्रामुख्याने नागरिकांच्या समस्या निराकरणासाठी लक्ष द्यावे. प्रामुख्याने पोर्टलवर दाखल तक्रारीची तातडीने दखल घेण्यात यावी. या तक्रारीची गांभीर्याने निपटारा करावा. तसेच कार्यालयात भेटीसाठी येणाऱ्या नागरिकांच्या भेटी घ्याव्यात. कार्यालयीन कामकाजात कृत्रिम बुद्धिमत्तेचा उपयोग करावा. यामुळे अचूक आणि आदर्श आदेश मिळण्यास मदत होणार आहे. शासनाने घरपोच सुविधा देण्याचा संकल्प केला आहे. त्यामुळे क्षेत्रिय स्तरावर फिरते सेतू केंद्र उभारण्याबाबत कार्यवाही करावी. यासोबतच जलसंधारण, वृक्षारोपण आणि सेवा हमी कायद्यांतर्गत देण्यात येणाऱ्या सुविधा राबविण्यावर भर द्यावा, असे आवाहन केले.




## झोप लागली नाही? तर मग तुमच्या रात्रीच्या आहारात काहीतरी चुकतंय

**दि.३विदर्भ प्रजासत्ताक**

पावसाळ्याच्या दिवसांत शरीर फिट ठेवणं आणि चांगली झोप घेणं या दोन्ही गोष्टी आरोग्यासाठी महत्त्वाच्या असतात. मात्र, झोपण्यापूर्वी काही अन्नपदार्थांचे सेवन केल्यास झोपेवर, पचनावर आणि एकूणच आरोग्यावर वाईट परिणाम होतो. या पार्श्वभूमीवर आहारतज्ज्ञ आरती भगत यांनी काही महत्त्वाचे आहारविषयक सल्ले दिले आहेत.



**झोपेआधी हे पदार्थ का टाळावे?**

तज्ज्ञांच्या मते, पावसाळ्यात पचनशक्ती कमी होते. त्यामुळे झोपण्यापूर्वी मसालेदार, तळलेले, साखरेचे किंवा कॅफेनयुक्त पदार्थ टाळावेत.

कॅफेनयुक्त पेये (कॉफी, चहा, कोल्ड्रिंक) झोपेस अडथळा निर्माण करतात.

मद्यपान केल्याने झोप लागली तरी ती खोल नसते आणि वारंवार जाग येते. यामुळे डिहायड्रेशन होऊन तोंड कोरडे पडते.

जास्त साखर असलेले पदार्थ ग्लुकोज पातळी वाढवतात, त्यामुळे शरीर अधिक सक्रिय राहते व झोप येत नाही.

**झोपेसाठी काय खावं?**

तज्ज्ञ आरती भगत सांगतात की, रात्री झोपण्यापूर्वी गरम दूध प्यायल्याने शांत झोप लागते.

दुधात जायफळ, हळद, केसर किंवा बदाम घालून घेतल्यास झोप सुधारते आणि शरीरही निरोगी राहते.

इलायची घालून दूध पिणे पचन सुधारते आणि झोपेवर सकारात्मक परिणाम होतो.

चांगली झोप म्हणजे चांगले आरोग्य. म्हणूनच, झोपेपूर्वी काय खावे आणि काय टाळावे याची काळजी घेणे अत्यंत आवश्यक आहे. विशेषतः पावसाळ्यात, पचनसंस्था संवेदनशील असल्याने अधिक खबरदारी आवश्यक आहे.

# निसर्गात ह्या पक्षांना कळते कधी येणार पाऊस? कसे लावतात अंदाज? जाणून घ्या सविस्तर?

**दि.३विदर्भ प्रजासत्ताक**

पाऊस येणार असल्याची आनंदवार्ता सुरुवातीला पक्षी देतात. त्यांच्या हालचाली, सुरेल आवाज, तसेच त्यांच्यात होणाऱ्या बदलातून पावसाचा ठोकताळा बांधला जातो.

सध्या ग्रामीण भागात पावशा 'सह इतर काही पर्जन्यदूत पक्षी आपल्या कृतीतून पावसाचे संकेत देत असल्याचे पक्षी अभ्यासक सांगतात. निसर्ग निरीक्षणात पक्ष्यांची भूमिका महत्त्वाची असते.

पक्ष्यांच्या हालचाली, त्यांच्या कृती, रंगात होणारा बदल, सुरेल आवजासह त्यांच्या घरटी बांधण्याच्या पद्धतीवरून पावसाचा अंदाज लावता येत असल्याचे पक्षी अभ्यासकांचे म्हणणे आहे.सध्या हवामानात झालेला बदल आणि गावोगावच्या शिवारात पर्जन्यदूत असलेल्या पक्ष्यांच्या हालचाली पाहता सुखसरी लवकरच बरसतील, असा शेतकऱ्यांचा अंदाज आहे.

**पावसाचे संकेत देणारे पक्षी**

तिबोटी खंडवा, निळ्या कानाचा खंडता, छोटा खंड्या हे पक्षी मे महिन्यात पावसाची चाहूल दर्शवतात. तसेच, पाणकोंबडी आणि मोर हे पक्षी पावसापूर्वी ओरडून पूर्वकल्पना देतात. कोकीळ, कावळा आणि चिमणीही आपल्या कृतीतून पावसाचे संकेत देत असल्याचे पक्षी अभ्यासकांनी सांगतले.

**'पेरते व्हा' म्हणणारा पावशा**

पावशा हा पक्षी पर्जन्यदूत मानला जातो. 'पेरते व्हा' असे




सांगणारा पावशा ओरडू लागला की, शेतकरी आजही मशागतीच्या कामाला सुरुवात करतात हे विशेष.

*नवरंग देतो पावसाची वर्दी*

नवरंग पक्षी पावसाची वर्दी देतो आणि त्याच्या विशिष्ट आवाजाने पावसाची चाहूल लागते, असे पक्षी अभ्यासक सांगतात. शेतकरीही नवरंग पक्षाच्या आवाजावर पावसाचा


शेतकरी ते थेट ग्राहक
**कामधेनु नॅचरल्स**
उत्तम आहार सर्वोत्तम जीवन
विषमुक्त फळे, भाजी व धान्य एकाच ठिकाणी
समर्थ हायस्कूल जवळ, अकोला अर्बन बँकेच्या बाजुने देवरणकर नगर, अमरावती
नंदकिशोर गांधी, मो. ७७२००७७५५०





पावसाळा जवळ आल्याचे संकेत आफ्रिकेतून येणारा चातवा पक्षी सर्वप्रथम देतो. चातक पक्षी 'पिऊ पिऊ.' अशा सांकेतिक आवाजात ओरडायला लागना की, पाऊसकाळ जवळ आला असे समजले जाते.

पक्षी विविध प्रकारे मान्सूनच्या आगमनाचे संकेत देऊ शकतात. पक्ष्यांच्या वर्तनात काही बदल होतात. हालचालीत वाढ होते. पावसाळा जवळ येताच ते अधिक सक्रिय आणि सुरेल आवाज काढतात. सध्या ग्रामीण भागात पक्ष्यांच्या अशा हालचाली दिसून येत आहेत.

**- डॉ. सुधीर कुंभार, पक्षी अभ्यासक,**

# बजरंग दलाचे राष्ट्रीय संयोजक यांची राष्ट्रसंताचे गुरुकुंज आश्रमाला भेट

## राष्ट्रसंतांच्या महा समाधीचे घेतले दर्शन

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.३गुरुकुंज मोझरी-** विश्व हिंदू परिषद, बजरंग दलाचे कार्य भारतासह विविध देशात सुद्धा चालते. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांची विश्व हिंदू परिषदेच्या स्थापनेत प्रमुख भूमिका होती. त्याचाच धागा धरत बजरंग दलाचे राष्ट्रीय संयोजक निरजजी दाणेरिया हे विदर्भाच्या दौऱ्यावर असताना राष्ट्रसंत श्री तुकडोजी महाराज यांची कर्मभूमी असलेल्या श्री क्षेत्र गुरुकुंज आश्रम ला भेट दिली. व राष्ट्रसंतांच्या महासमाधीचे दर्शन घेतले व आश्रमय परिसराची



माहिती जाणून घेतली. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या राष्ट्रीय विचारांवर चर्चा केली. याप्रसंगी संस्थेचे डॉ. राजारामजी बोथे, बजरंग दलाचे प्रांत संयोजक नवीनजी जैन, सिद्धूजी सोलंकी, विश्व हिंदू परिषदेचे जिल्हा मंत्री रुपेश राऊत, शरद कांडलकर, विजय पुनसे, अजय उमप, सुधीर होले आदी उपस्थित होते.

# गाव पातळीवर विकसित कृषी संकल्प अभियान

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.३अमरावती**

शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढविण्याच्या दृष्टीने दि. २९ मे पासून देशभरात एकाच वेळी विकसित कृषी संकल्प अभियान केंद्र शासनातर्फे केंद्रीय कृषी व शेतकरी कल्याण आणि ग्रामीण विकास मंत्री शिवराज सिंह चव्हाण यांच्या नेतृत्वात राबविण्यात येत आहे. या अभियानाअंतर्गत नुकतेच वरुड तालुक्यातील लोणी, बेनोडा व जरुड येथे या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. मृदा सर्वेक्षण विभाग, भारतीय कृषी अनुसंधान परिषद, नवी दिल्ली यांच्यातर्फे वरिष्ठ शास्त्रज्ञ डॉ. ए. ओ. शिराळे तसेच कृषी विज्ञान केंद्र दुर्गापूर येथील कृषी विस्तार तज्ज्ञ डॉ. प्रताप जायले, डॉ. महेश आखूड, राहुल घोगरे यांनी मार्गदर्शन केले.

कार्यक्रमात शेतकऱ्यांना जैविक शेतीचे महत्त्व, माती परीक्षण, बीज प्रक्रिया, जैविक खते व कीडनाशकांचा संतुलित वापर, एकात्मिक कीड व्यवस्थापन, उत्पन्न वाढीसाठी एकात्मिक पीक व्यवस्थापन, शासनाच्या



विविध योजना, पशुसंवर्धन कृषी तंत्रज्ञान, ड्रोन प्रात्यक्षिक, बियाणे क्षमता प्रात्यक्षिक आदी अनेक विषयांवर तज्ज्ञांनी मार्गदर्शन केले.माहिती देताना डॉ. शिराळे यांनी मातीचा जिवंतपणा कसा टिकून ठेवावा, माती परीक्षण करणे का गरजेचे आहे, मातीचा नमुना कसा घ्यावा याविषयी मार्गदर्शन केले. डॉ. जायले यांनी रासायनिक खतांचा सुयोग्य वापर, जैविक खतांची गरज यावर माहिती दिली.

कार्यक्रम सहायक राहुल घोगरे यांनी शेतकऱ्यांनी अन्न प्रक्रिया व मूल्यवर्धन या बाबींकडे वळणे गरजेचे असल्याचे सांगितले. पशुसंवर्धन विभागाचे डॉ. आखूड यांनी शेती करताना जोड व्यवसाय करणे ही आज काळाची गरज असल्याचे सांगून पशुपालन करताना शासनाच्या विविध योजना याविषयी त्यांनी माहिती दिली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. प्रतापराव जायले यांनी केले. सूत्रसंचालन तालुका तंत्रज्ञान व्यवस्थापक लक्ष्मीकांत श्रीराव यांनी तर कृषी सहायक स्नेहा म्हैसणे यांनी आभार मानले.-


आपल्या परिसरातील बातम्या, लेख, यशोगाधा, जाहिरात तुम्ही आमच्या मेल वर पाठवू शकता prajasattaknews.24gmail.com, arunjoshi.ucn@gmail.com या मेल वर पाठवा आमचा अंक तुम्हाला अगदी मोफत मिळवायचा असेल तर आम्हाला मेल करा तुमचा व्हाट्सअप नंबर
सांध्य दैनिक विदर्भ प्रजासत्ताक RNI NO-M-HM-R 2023/84526-प्रिंट / **PDF** / वेब - पोर्टल /ई - पेपर

क्यु आर कोड स्कॅन करा ग्रुप ला जॉईट व्हा

# विदर्भ प्रजासत्ताक

मंगळवार दि. ३ जून २०२५ शहर/ग्रामिण

## सणांची सुरूवात, भवई संपन्न

# मेळघाटात मुला-मुलींनी लावले बेडकाचे लग्न

## वांझोट (निफळ) झाडाखाली वन भोजन

**विदर्भ प्रजासत्ताक दि.३धारणी-** मेळघाटातील आदिवासींच्या परम्परा अगदी जगा वेगळ्या आहेत. सण व चालरिती आणि अफलातून परम्परा चे माहेरघर असलेल्या मेळघाटात सणाचा श्रीगणेशा करण्यासाठी पण भवई नावाचा एक सण साजराकेल्या जातो. मुले-मुली या सणात बेडुक - बेडकीचे लग्न करतात. नाचत-गाजत गावभर फिरूण वर्गणी करून वन भोजनाचे आयोजन करतात. गावात एखाद्या झाडाला प्रामुख्याने ज्या आंबाच्या झाडाला फळे लागत नाही म्हणजे वांझोट असलेल्या झाडाखाली वन भोजनचा आनंद लुटण्याची परम्परा अनेक गावात आहे.



पावसाळ्यात निसर्गावर आधारीत सणाचा तडाखा मेळघाटात सुरू होत असतो. सणांचा श्रीगणेशासाठी पण भवई नावाचाएक सण आहे. यानंतर जिरोती साजकरी होत असते. आदिवासींचे सर्व सण शेती, पर्यावरण, निसर्ग आणि मानवीय परम्परांचा मेळ असतात. भवई साजरी करण्याचीपरम्पराकाही गावामध्ये वेगवेगळी असली तरी जांभळाच्या फांद्या डोक्यावर ठेऊन गावात मौजमस्तीने फिरतांना लोक गितांचा आनंद लुटणे सर्व गावात असते.डेडरादे, पाणीदेः झारापाला सुकी गाये, पाणी दे-पाणी दे, हनुमान बाबा पाणी बुलाया, सारखे मनोरंजनावर पण पावसाठी देवाला आग्रह करणाऱ्या घोषणा देण्यात येतात. ब बेडुक (डेडर) व बेडकीचे लग्न मुले-मुली लावतात. गावातील एखादे झाड वांझोट (बांझ) असल्यास सार्वजनीक पंगत त्या झाडाखाली देत असतात. यामुळे त्या झाडाला फळ येणे सुरू होत असते, अशी मान्यता आहे. अनेकदा हा तोडगा खरा पण ठरलेला आहे. जेष्ठ अमावशेला भवई होत असते. घरात आमरस आणि शेवळ्याचे भोजन तयार करण्यात येते. एक दिवस आधी जंगलातून बांबू आणण्यात येतात. बांबुचा चरपट करून गोल आकार देण्यात येत असतो. भिमलाचे प्रजन केल्यावर घरामध्ये मधोमध धारणवर टांगण्याची परम्परा आहे. चांगला पाऊस्पडो व धनधान्याची भरभराट होण्यासाठी देवाना विनंती करण्यात येते. मेळघाटच्या आदिवासी संस्कृतीवर निमाडच्या परम्परांचा पगडा असल्याने लोकगिती, नृत्य आणि रितिरिवाज म्हणून मध्यप्रदेशाची झलक मिळत असते.

मध्यप्रदेशाच्या बैतुल, बुरहानपुर, खंडवा जिल्हयातील आदिवासी भागाला लागून असलेल्या मेळघाटच्या परम्परा अगदी वेगळ्या आहेत.

# एम.डी. अंमली पदार्थासह बियाणी चौकातून एकास अटक

## शासकीय विश्रामगृहासमोर ग्राहकाला देणार होता २५ ग्रॅम एमडी



**विदर्भ प्रजासत्ताक दि.३अमरावती**

पोलीस आयुक्त अरविंद चावरिया यांच्या आदेशावरून क्रिमिनल इंटेलिजन्स युनिटच्या पथकाने एम.डी. नावाचा अंमली पदार्थ विक्रीस आणणाऱ्या इसमावर कारवाई करत २.२० लाखांचा मुद्देमाल जप्त केला आहे. २ जून रोजी गुप्त माहितीच्या आधारे पोलिसांनी बियानी चौक मार्गावर सापळा रचून उमेश महादेवराव मेश्राम (४९, रा. मिलचाळ, नवी वस्ती, बडनेरा) याला ताब्यात घेतले. त्याच्या अंगझडतीत पँटच्या खिशात पारदर्शक पिशवीत २५ ग्रॅम एम.डी. पावडर आढळून आली. या अंमली पदार्थाची अंदाजे किंमत १.२५ लाख रुपये आहे. त्याच्याकडून ïर्ळों कंपनीचा मोबाईल (१५ हजार), तसेच होंडा ॲक्टिव्हा (८० हजार) असा एकूण २.२० लाखांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.एम.डी. हा पदार्थ विक्रीसाठी नेल्याची कबुली आरोपीने दिली असून, त्याच्यावर एन.डी.पी.एस. कायद्यांतर्गत कलम २२(ब), ८(क), २९ अंतर्गत फ्रेजरपुरा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.पोलीस आयुक्त अरविंद चावरीया यांनी दिलेल्या आदेशावरून विशेष पथकाच्या अधिकाऱ्यांनी शहरात आपले गुप्तहेर कामाला लावले. दरम्यान त्यांना माहिती मिळाली की, एक युवक बडनेरा येथून दुचाकीने चपराशीपुरा येथील विश्रामगृहासमोर ड्रग्ज देण्याकरिता येत आहे. या माहितीच्या आधारावर पथकातील कर्मचाऱ्यांनी सापळा रचला आणि युवक येताच त्याला ताब्यात घेतले. उमेश मेश्रामची अंगझडती घेतली असता त्याच्याजवळ २५ ग्रॅम एम.डी. ड्रग्ज दिसले. पोलिसांनी त्याला ताब्यात घेऊन गुन्हा नोंदविण्याची प्रक्रिया सुरू केली. या कारवाईत सहाय्यक पोलीस निरीक्षक महेंद्र इंगळे यांच्यासह सुनिल लासुरकर, अतुल संभे, जहिर खान आणि राहूल देंगेकर यांच्या समावेश होता.

# नमो शेतकरी सन्मान योजनेच्या हप्त्यात वाढ होणार?

## अमरावती जिल्ह्यात पात्र शेतकरी २ लाख ७४ हजार ६४५

**विदर्भ प्रजासत्ताक दि.३अमरावती-** पीएम किसान योजनेच्या धर्तीवर सुरू असलेल्या नमो शेतकरी सन्मान योजनेच्या लाभार्थ्यांना यापूढे ६ हजारांऐवजी ९ हजार रुपये देऊ, असे आश्वासन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी चार महिन्यांपूर्वी दिले होते.

योजनेचा पुढील हप्ता खरीप हंगामापूर्वीच देऊ असेही सांगितले होते. मात्र, यासाठी अतिरिक्त ३ हजार कोटींची तरतूद न झाल्याने या आश्वासनांचाबत राज्य सरकारच्या पातळीवर कोणतीही हालचाल दिसून येत नाही.

दरम्यान या दोन्ही योजनांसाठी ॲग्रीस्टॅक योजनेतील शेतकरी ओळख क्रमांक बंधनकारक करण्यात आला असला तरी नमो शेतकरी सन्मान योजनेसाठी अद्याप त्याची कार्यवाही झाली नसल्याचेही दिसून आले आहे. नमो शेतकरी सन्मान योजनेत सातव्या हप्त्यासाठी राज्यात ९३ लाख शेतकरी पात्र ठरले आहेत.यात अमरावती जिल्ह्यातील २ लाख ७४ हजार ६४५ पात्र ठरले आहेत.

### हप्त्याकरिता जिल्हानिहाय पात्र शेतकरी संख्या

| | | |
|---|---|---|
| अहिल्यानगर- ५ लाख ५१ हजार ५१९ | जळगाव -४ लाख ८ हजार ६२१ | पुणे - ४ लाख ४६ हजार २४ |
| अकोला - १ लाख ९० हजार ४७१ | जालना -३ लाख १ हजार ४२ | रत्नागिरी - १ लाख ५८ हजार ९९८ |
| अमरावती - २ लाख ७४ हजार ६४५ | कोल्हापूर - ४ लाख ८४ हजार | सांगली - ३ लाख ९९ हजार ४२२ |
| छ. संभाजीनगर - ३ लाख ४६ हजार ८५० | लातूर - २ लाख ७२ हजार ४९५ | सातारा - ४ लाख ५२ हजार ४८३ |
| बीड - ३ लाख ७९ हजार ८१७ | नागपूर - १ लाख ८१ हजार ६५ | सिंधुदुर्ग - १ लाख २२ हजार ६३७ |
| भंडारा - २ लाख १९ हजार ३८२ | नांदेड -३ लाख ८५ हजार ६३७ | सोलापूर - ५ लाख ४ हजार १७५ |
| चंद्रपूर - २ लाख ५० हजार ६३८ | नंदुरबार - १ लाख ५ हजार ४११ | ठाणे - ७४ हजार २७८ |
| धुळे - १ लाख ५७ हजार ७४२ | नाशिक - ४ लाख ४१ हजार ८०३ | वर्धा - १ लाख ३१ हजार ३ |
| गडचिरोली - १ लाख ५२ हजार ९७२ | धाराशिव - २ लाख ३७ हजार ७२ | वाशिम - १ लाख ६७ हजार ७०८ |
| गोंदिया - २ लाख २३ हजार १६० | पालघर - १ लाख १५९ | यवतमाळ -२ लाख ९४ हजार ४८ |
| हिंगोली - १ लाख ७७ हजार ७४ | परभणी - २ लाख ५१ हजार ८५७ | एकूण ९३ लाख ७ हजार ७२१ |

पीएम किसान योजनेच्या विसाव्या हप्त्याच्या वितरणप्रसंगी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या उपस्थितीत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी नमो शेतकरी सन्मान योजनेच्या लाभार्थ्यांना तीन हप्त्यांत दिल्या जाणाऱ्या ६ हजार रुपयांमध्ये आणखी तीन हजारांची भर घालू, त्यामुळे दोन्ही योजनांमधून शेतकऱ्यांना १३ हजारांऐवजी १५ हजार रुपये मिळतील.तसेच, नमो शेतकरी सन्मान योजनेचा हप्ता खरीप हंगामापूर्वीच देऊ, अशी आश्वासने दिली होती. मात्र, या आश्वासनांविषयी राज्य सरकारच्या पातळीवर कोणतीही हालचाल दिसून येत नसल्याचे स्पष्ट झाले आहे.




नमो शेतकरी सन्मान योजनेचा एप्रिल ते जुलै या कालावधीतील सातवा हप्ता जून महिन्यातच मिळणार होता. मान्सूनने राज्यात दमदार हजेरी लावल्यानंतर शेतकरी आता पेरण्यांच्या कामात व्यग्र झाले आहेत.बियाणे आणि खतांच्या खरेदीसाठी नमो शेतकरी सन्मान योजनेतील हप्त्याचे पैसे कामे येतील, असे शेतकऱ्यांना वाटत होते. मात्र, अद्यापही या योजनेच्या हप्त्याविषयी स्पष्टता झालेली नाही


या योजनेतील शेतकऱ्यांना वर्षाकाठी तीन हजार रुपयांची वाढ करावी लागणार असल्याने त्यासाठीची ३ हजार कोटींची तरतूद नुकत्याच सादर करण्यात आलेल्या अर्थसंकल्पात करण्यात आलेली नाही.त्यामुळे राज्य सरकारवर पडणारा हा अतिरिक्त तीन हजार कोटींचा भार कसा वर्ग केला जाईल, याकडे कृषी विभागाचे लक्ष लागून आहे. नमो शेतकरी सन्मान योजनेच्या ७व्या हप्त्यासाठी ९३ लाख ७ हजार ७२१ शेतकरी पात्र ठरले आहेत.यात ॲग्रिस्टॅक योजनेतील शेतकरी ओळख क्रमांक बंधनकारक करण्यात आलेला नाही. याबाबत राज्य सरकारने अद्याप सूचना दिलेली नाही, त्यामुळे सूचना आल्यानंतर केवळ ॲग्रिस्टॅक ओळख क्रमांक असलेल्या शेतकऱ्यांना या योजनेचा हप्ता दिला जाईल, अशी माहिती कृषी विभागातील सूत्रांनी दिली.राज्यातील शेतकऱ्यांना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पीएम किसान योजनेच्या धर्तीवर नमो शेतकरी सन्मान योजने अंतर्गत ६ ऐवजी ९ हजार रूपये प्रत्येकी देऊ असे आश्वासन दिले होते मात्र त्याची पूर्तता अद्याप झाली नाही.

# अंजनगाव सुर्जी शहरातील साफसफाईचे वाजले तीन तेरा

## कंत्राटी सफाई कामगारांचे कामबंद आंदोलन

## पगार थकविल्याने उपासमारीची वेळ

**विदर्भ प्रजासत्ताक दि.३अंजनगाव सुर्जी-** अंजनगाव सुर्जी शहरातील साफसफाई करणाऱ्या सफाई कामगारांना गेल्या दोन महिन्या 'पासून पगार न मिळाल्यामुळे त्यांनी १ जून २०२५ पासून कामबंद आंदोलन सुरू केले आहे. कंत्राटदाराने पगार थकविल्याने कामगारांवर उपासमारीची पाळी आली असून कामगार संघटनेचे अध्यक्ष सचिन गावंडे यांनी जोपर्यंत कंत्राटदार कामगारांचे पगार करणार नाही तोपर्यंत काम बंद राहणार म्हणून पगार देण्याची मागणी केली आहे.कंत्राटी सफाई कामगार यांचे माहे एप्रिल व मे २०२५ दोन महिन्याचे मासिक वेतन थकविल्याने मजुरांना जीवन जगणे कठीण झाले आहे. त्यामुळे त्यांच्यावर उपासमारीची पाळी आली आहे. पगार न झाल्याने दोन वेळच्या जेवणाची अडचण झाली तसेच मुलांचे ॲडमिशन, शाळेची फी, दवाखाना इत्यादी कामासाठी परिस्थिती बिकट आली आहे. यास कारणीभूत नगर परिषदेचा असून नगर परिषदेने ठेकेदाराचे बिल दिले नाही म्हणून मजुरांचे पगार थकविले आहे. हे कारण सांगून कंत्राटदाराने सफाई कामगारांना पगार दिला नाही. म्हणून कामगारांनी कामबंद आंदोलन पुकारले आहे. या सर्व बाबीचा उलगडा होण्यासाठी सचिन गावंडे यांनी पत्रकार परिषदेचे आयोजन करुन उपस्थित पत्रकारांना कामबंद आंदोलन पुकारल्याची माहिती दिली. ठेकेदाराने पगार काढलेला नाही. या करिता नगर परिषद अधिकारी आमची जबाबदारी नाही, म्हणून अंग झटकत आहे. या करिता सफाई कामगारांनी दाद कुणास मागावी.



मुख्याधिकारी यांनी कंत्राटदाराला समज देऊन मजुरांचे पगार व्याजासकट देण्याचे आदेश जारी करावेत, संबंधित कंत्राटदाराला काळ्या यादी (ब्लॅकलिस्टमध्ये) टाकून त्यास ठेका देण्यात येऊ नये, जेणेकरून पगार थकीत राहणारनाही. तसेच नगर परिषदनेयाबाबततातडीने वनघेतल्यासकामबंद आंदोलताचा पवित्रा घेतला आहे. अशा बेजबाबदार कंत्राटदारांमुळे कामगारांना तसेच जनतेला अनेक समस्यांना सामोरे जावे लागत. नगर परिषदने व त्यांचे त्यांचे ठेकेदाराने वेतन न दिल्यास मुख्याधिकारी व ठेकेदारावर गुन्हा दाखल करणार असल्याचे त्यांनी पत्रकार परिषदेत सांगितले, तसेच कामगारांना इपीएफ, पगार वाढ, मेडिक्लेम, साप्ताहिक सुट्टी, सुरक्षा उपकरणे, दोन महिन्यातून एकदा आरोग्य तपासणी इत्यादी सुविधा लागू करण्यात याव्यात अशी मागणी कामगारांनी केली आहे आहे. पत्रकार परिषदेला श्रीनाथ रेखाते, संदीप भोंडे, अभिजीत भावे, सुंदरलाल तांबे, पंकज धुळे, श्रीकांत नाठे, हरीचंद्र वानखडे, बिटू मतेलकर, गोविदाटिपरे, निता मोंगरे सह बहुसंख्य सफाई कामगार उपस्थित होते.

# एमपीएससी परीक्षेत इलेक्ट्रॉनिक गॅझेट वापरणाऱ्या विद्यार्थ्यास पकडले

## ब्रिजलाल बियाणी कॉलेजमधील घटना

**विदर्भ प्रजासत्ताक दि.३अमरावती-** महाराष्ट्र लोकसेवा आयोगातर्फे घेण्यात आलेल्या महाराष्ट्र गट १ सेवा संयुक्त पूर्व परीक्षेमध्ये एक विद्यार्थी इलेक्ट्रॉनिक गॅझेट वापरताना आढळल्याने राजापेठ पोलिसांनी संबंधित विद्यार्थ्यांविरुद्ध गुन्हा नोंदवून त्याला अटके व समजपत्रावर त्याची सुटका केली. ही घटना रविवारी ब्रिजलाल बियाणी कॉलेजमध्ये घडली. सर्व्हेश श्याम देशमुख (वय २३, रा. फुबगांव. ता. दारव्हा, जि. यवतमाळ) असे गुन्हा दाखल झालेल्या विद्यार्थ्याचे नाव आहे.

महाराष्ट्र राज्य लोकसेवा आयोगातर्फे रविवारी पूर्ण राज्यात महाराष्ट्र गट क्र. १ सेवा संयुक्त पूर्व परीक्षा २०२४ घेण्यात आली होती. काही कॉलेजमध्ये परीक्षेचे सेंटर देण्यात आले होते. तसेच पोलिसांचा तगडा बंदोबस्त तैनात करण्यात आला होता. ज्या केंद्रावर परीक्षा घेण्यात आली त्या केंद्राच्या १० मिटरपर्यंतची सर्व दुकाने बंद करण्यात आली होती. तसेच परीक्षा देण्याकरिता आलेल्या विद्यार्थ्यांना डिजीटल डायरी, पेजर, मायक्रोफोन, मोबाईल फोन, नेक बॅन्ड, स्मार्ट वॉच यासारखी दुरसंचार साधणे परिक्षा केंद्रावर, परिसरात तसेच परिक्षा कक्षात आणण्यास तसेच जवळ बाळगण्यास सक्त मनाई होती. परीक्षार्थी प्रत्येक उमेदवारांची दोन ते तीन वेळा तपासणी केल्यानंतर त्यांना परीक्षा देण्याकरिता वर्गात पाठवीण्यात आले. दरम्यान ब्रिजलाल बियाणी येथील परिक्षा केंद्रावर पेपर सुरु असताना ११.२५ वाजताच्या दरम्यान सर्व्हेश देशमुख हळू आवाजात बोलून पेपर लिहित असल्याचे केंद्रावरील नायब तहसीलदार मंगेश भास्करराव सोळंके यांच्या लक्षात आले. त्यांनी त्याचा पेपर घेतला आणि त्याची पुन्हा तपासणी केली असता त्याच्याजवळ नेक बॅन्ड हेड फोन आढळला. नायब तहसीलदार सोळंके यांनी राजापेठ पोलिसांना माहिती दिली. पोलिसांनी सर्व्हेश देशमुख याला ताब्यात घेऊन गुन्हा दाखल केला.

# विभागीय भांडारातून बॅटरी चोरणाऱ्या तिघांना अटक

**विदर्भ प्रजासत्ताक दि.३अमरावती-** बॅटरी चोरी प्रकरणात फ्रेजरपुरा पोलिसांनी सोमवारी तिन चोरट्यांना अटक करून त्यांच्या ताब्यातून चोरीच्या सहा बॅटऱ्या किंमत ७७ हजार ८०० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. रुपेश सतन पवार (वय २०), लखन बसन पवार (वय १९) आणि नयन उर्फ आहेन मैलेश चव्हाण (वय २१ तिन्ही रा. पारधी बेडा) अशी अटकेतील आरोपींची नावे आहेत.तपोवन मार्गावर राज्य परिवहन महामंडळाचे विभागीय भांडार आहे. २६ मे रोजी विभागीय



भांडार अधिकारी नितीन शंकरराव जोग (वय ५३) हे बस दुरुस्तीकरिता लागणाऱ्या कामाचा लेखाजोखा तपासत होते. तेव्हा त्यांना निकामी झालेल्या १३६ बॅटऱ्यापैकी६ बॅटऱ्या चोरी झालेल्या दिसताच त्यांनी पोलीस ठाण्यात तक्रार दिली. त्या आधारावर पोलिसांनी गुन्हा दाखल करून चोरट्यांचा शोध सुरू केला. तसेच विभागीय भांडारमधील सीसीटीव्ही कॅमेऱ्यांची पाहणी केली असता तिन युवक चोरी करताना दिसताच पोलिसांनी त्याची ओळख पटवीण्याचा प्रयत्न केला. त्यांची ओळख पटताच सोमवारी तिघांना अटक करून चोरीच्या बॅटऱ्या जप्त केल्या. या कारवाईत ठाणेदार निलेश करे यांच्या मार्गदर्शनात पोलीस निरीक्षक निलेश गावंडे, पोलीस उपनिरीक्षक राहूल महाजन, पोलीस अंमलदार सुभाष पाटील, शशिकांत गवई, सचिन बोरकर, जावेद पटेल, सागर चव्हाण, रामकृष्ण चांगोले आणि अमोल राठोड यांच्या समावेश होता.-

# रक्तदान करून नवदाम्पत्याची नव जीवनाची सुरुवात

## वर, वधुसह तब्बल ३४० वऱ्हाडींचे रक्तदान

### दर्यापूरमध्ये एक विवाह ठरला 'माणुसकीचा सोहळा', ११ शेतकरी विधवांना साडी-चोळी, बि-बियाणे भेट

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३अमरावती**-विवाहाच्या मुहूर्ताच्या आधीच नवविवाहित दाम्पत्याने सर्वप्रथम रक्तदान करून जीवनातील नव्या पर्वाची सुरुवात केली. त्यांच्यासोबत आलेल्या तब्बल ३४० वऱ्हाडी मंडळींनीही रक्तदानात सहभाग घेतला. एका विवाहाच्या निमित्ताने समाज सेवेचा दीप प्रज्वलित करणारा एक आगळा-वेगळा सोहळा दर्यापूरमध्ये पार पडला. विकी भारतराव माहोरे आणि ऋऋतुजा मुकुंदराव वर्गे यांचा विवाह ३१ मे २०२५ रोजी पार पडला. पण हा विवाह केवळ दोन जीवांचा संग नव्हता, तर तो होता समाज हितासाठीचा एक प्रेरणादायी आदर्श





! चि. विकी भारतराव माहोरे (रा. तामसवाडी, ता. चांदूर बाजार) आणि चि. सौ. का. ऋतुजा मुकुंदराव वर्गे (रा. नालवाडा, ता. दर्यापूर) यांचा विवाह ३१ मे२०२५ रोजी, शनिवार दिनी इंद्रप्रस्थ मंगल कार्यालय, दर्यापूर येथे समाजा समोर एक वेगळा आदर्श ठेवत पार पडला. मंगलाष्टकाच्या गजरात नव्हे, तर टाळ-मृदुंगाच्या तालावर व चिमुकल्या वारकरी संचासह आणि शेतकरी जगाचा सन्मान म्हणून बैल बंडीतून वधू वरांचे आगमन झाले. बँड-बाज्यांचा कर्णकर्कश आवाज टाळून निसर्गाशी, मातीतल्या माणसांशी एकरूप होणारा हा सोहळा डोळ्यांचे पारणे फेडणारा ठरला.या लग्न सोहळ्याची खरी झळाळी होती ११ शेतकरी आत्महत्याग्रस्त व गरजू विधवा महिलांना मदतीचा हात देणे. विवाह समारंभात वधू-वरांनी स्वतः पूजन करून सन्मानपूर्वक त्यांना शेतीपयोगी बियाणे (सोयाबीन, तूर, कपाशी), साडी-चोळी, तसेच त्यांच्या मुलांना शालेय पुस्तके, वह्या, पेन व आर्थिक मदत दिली.सन्मानित लाभार्थ्यांमध्ये लसनापूर येथील संगिताताई उके, प्रविणाताई तळकीत, वनिताताई उके, वडुराच्या चित्राताई भोकसे, बरुहऱ्हाणपूरच्या सारिकाताई इंगळे, राजना पूर्णा येथील वनिताताई काळमेघ, तळवेलच्या शुभांगीताई नागपुरे, खराळ्याच्या अर्चनाताई जवंजाळ, खरवाडीच्या राधिकाताई भुरे, व जवळा शहापूरच्या सुनीताताई पाथरे व संगिताताई तट्टेयांचा समावेश होता.एवढेच नाही तर या विवाह सोहळ्यामध्ये वर आणि वधुसह सुमारे ३४० वऱ्हाडींनी रक्तदान करून सामाजिक दायित्व पार पाडले.

# आ.रवि राणा यांच्या मंजुर विकास निधीमधुन

## प्रभाग क्र.११ फ्रेजरपुरा मधिल लक्षावधी रुपयांचा भुमीपुजन सोहळा संपन्न

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३अमरावती**
आपल्या विकास कामांचा धडाका कायम ठेवत आ.रवि राणा हे बडनेरा मतदार संघातील शहर तसेच ग्रामीण विभागातील जनतेच्या मुलभुत सोयी सुविधा पुर्ण व्हाव्या याकरीता शासनाकडुन कोटयावधी रुपयांचा निधी आणून जनतेची विकास कामे करीत आहे.त्या अनुषंगाने नुकताच प्र.क्र.११ फ्रेजरपुरा मधिल किरण नगर येथे श्री.मनवार ते श्री.डवले यांच्या घरापर्यत सिमेंट रस्त्याचे बांधकाकाचे भुमीपुजन आ.रवि राणा यांचा हस्ते करण्यात आलेयावेळी भुमीपुजन करतांना आ.रवि राणा यांनी सांगीतले की, जनतेच्या मुलभुत सोयी सुविधाकडे लक्ष देण्याचे काम माझे असून प्रभागा प्रभागात व ग्रामीण भागात विकास निधी कमी पडु देणार नाही याची



जनतेला ग्वाही दिली.यावेळी किरण नगर परीसरातील जनतेने आ.रवि राणा यांचे आभार व्यक्त केले. यावेळी शहर महिला अध्यक्ष अर्चना तालन, वावरकरताई, कोकीळाबाई देशमुख, भुषण पेडके, गिरीष खरड, निखिल आकोटकर, भुषण ठाकरे, दिपक देशमुख, सुभाष वानखडे, साहील लाडुकर, गोलु तायडे, सुजीत माळोदे, शुभम पाटील, आनंद कोंडण्यपुरे, पवन डहाके, जयेश निंघोट, तसेच राष्ट्रीय प्रशिक्षक नंदा सावदे, शिल्पासावदे, सोनाली गासे, प्रशांत चौधरी, डॉ.पापडी चौधरी, देव्यांनी चौधरी, प्रतीभा हेगो, रेखा ढवळे, वंदना ढेपे, योगीता नागझिरकर, आरती यादव, संगीता नाकाडे, रोहीनी देशपांडे, सौ.गिता बाहेकर, शुभदा संत, मिना सोनोने, रेणुका शहाने, शोभा धनसकर, कोमल जाधव, शिरीष हेगु, देविदास धनसकर, मोहन संत, राजेश बाहेकर,तारेगावकर, विकास इंगोले व किरण नगरातील इतर मान्यवर नागरीक उपस्थित होते.

# अचलपूर येथे मारहाण करीत १० लाखांची रोकड पळविली

## कार खरेदीच्या नावाखाली बोलावून लुबाडले

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३अचलपूर**-चांदुररेल्वे तालुक्यात सुकलवाडा येथील सुधाकर नामदेव राऊत यांना कार खरेदीच्या बहाण्याने बोलावून त्यांना मारहाण करीत त्यांच्याकडील १० लाखांची रोकड लंपास करण्यात आली. ही धक्कादायक घटनाअचलपूरजवळ त्रिवेणी संगम परिसरात घडली. या घटनेने परिसरात खळबळ उडाली आहे.सुधाकर राऊत यांनी परतवाडा येथे एका एजेंटच्या माध्यमातून अटींका कार खरेदीचा व्यवहार निश्चित केला होता. कार खरेदीसाठी १० लाख रुपये रोख घेऊन ते परतवाडाकडे निघाले होते. मात्र, एजेंटने त्यांना चांदुरबाजार नाक्याजवळील त्रिवेणी संगम परिसरात थांबण्यास सांगितले. त्यानुसार राऊत त्यांना सांगितलेल्या ठिकाणी थांबले, तेवढ्यात एका कारमधून तीन ते चार अनोळखी व्यक्ती आले व राऊत यांना मारहाण करण्यास सुरुवात केली. त्यांच्याकडील संपूर्ण रोकड जबरदस्तीने हिसकावून घेतली आणि एजंटलाही कारमध्ये घेऊन गेले, असे राऊत यांनी परतवाडा पोलिसांना सांगितले.तक्रारीवरून अज्ञात आरोपींविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. परिसरातील सीसी टीव्ही फुटेजची पाहणी सुरू आहे. लवकरच आरोपींचा तपास लागेल. वाहन खरेदी-विक्रीच्या व्यवहारात फसवणुकीच्या घटना वाढत असल्याने नागरिकांनी अधिक दक्षता बाळगावी, असे पोलीस निरीक्षक सुरेश म्हस्के यांनी सांगितले.

## दुचाकीवरून खाली पडून फौजदाराचा मृत्यू

**विदर्भ प्रजासत्ताकदि.३अमरावती** दुचाकीने अमरावतीला परत येत असताना अचानक भोवळ आल्याने दुचाकीवरून खाली पडून फौजदाराचा मृत्यू झाल्याची धक्कादायक घटना सोमवारी दुपारी घडली. राजेंद्र डहाके (रा. पुंडलिकबाबानगर) असे मृत पोलीस उपनिरीक्षकाचे नाव आहे.पोलीस उपनिरीक्षक राजेंद्र डहाके हे कोर्टातील पोलिसांचे कामकाज सांभाळत होते. सोमवारी दुपारी ते काही कामानिमीत्त कठोरा गांवाला गेले आणि दुचाकीने परत येत असताना गावालगतच्या मंदिराजवळ त्यांना भोवळ आली. त्यांनी दुचाकी थांबवीण्याचा प्रयत्न केला. परंतु ते खाली पडले. गावकऱ्यांनी धाव घेतली आणि नांदगावपेठ पोलिसांना माहिती दिली. तसेच परिचित डॉक्टरला बोलविले. डॉक्टरांनी तपासताच मृत घोषीत केले. या घटनेमुळे पोलीस दलात शोककळा पसरली आहे. तसेच नांदगावपेठ पोलिसांनी घटनास्थळाचा पंचनामा करून आकस्मिक मृत्यूची नोंद घेतली.-

# पॉलिटेक्निकसाठी १६ जूनपर्यंत अर्ज करावेत

## जिल्ह्यात एकूण ८१० जागा उपलब्ध

### २३ रोजी अंतिम गुणवत्ता यादी जाहीर होणार

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३ यवतमाळ**-दहावीच्या परीक्षेचा ऑनलाइन निकाल जाहीर झाल्यानंतर आता पुढील अभ्यासक्रमांच्या प्रवेश प्रक्रियेला सुरुवात झाली आहे. दहावीनंतर विद्याथ्यार्थ्यांना अकरावी बरोबरच तंत्रशिक्षणाची संधी उपलब्ध असून, तीन वर्षांच्या पॉलिटेक्निक डिप्लोमासाठी विद्यार्थी प्रवेश घेऊ शकतात. तंत्रशिक्षण मंडळातर्फे पॉलिटेक्निक प्रवेश प्रक्रियेचे वेळापत्रक प्रसिद्ध करण्यात आले असून, विद्यार्थ्यांना सोमवार, दि. १६ जून पर्यंत ऑनलाइन अर्ज नोंदणी व आवश्यक कागदपत्रे अपलोड करावे लागतील. १८ जूनला तात्पुरती गुणवत्ता यादी जाहीर होऊन २१ जूनपर्यंत ग्रीव्हन्स (आक्षेप) दुरुस्तीची संधी असेल. २३ जूनला अंतिम गुणवत्ता यादी जाहीर होईल.

जिल्ह्यात पॉलिटेक्निक डिप्लोमाच्या तिन महाविद्यालयांमध्ये ८१० जागा उपलब्ध आहेत. शैक्षणिक वर्ष २०२५ व २०२६ याकरिता तंत्रशिक्षण (पॉलिटेक्निक) पदविका अभ्यासक्रमासाठी केंद्रिभूत प्रवेश प्रक्रियेला सुरुवात झाली आहे. दहावीनंतरच्या प्रथम वर्ष डिप्लोमा इंजिनिअरिंग प्रवेशासाठी ऑनलाइन अर्ज नोंदणी प्रक्रिया डीटीईच्या पोर्टलवर सुरू झाली असून, प्रवेश घेऊ इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांना माहिती भरून प्रक्रियेत सहभागी होता येणार आहे.

विद्यार्थ्यांना नोंदणी व कागदप



कागदपत्रांची करता येईल. पडताळणी ऑनलाइन नोंदणी करताना कागदपत्रांच्या छायांकित प्रतीही स्कॅन करून अपलोड कराव्या लागणार आहे. दहावीत मिळालेल्या गुणांची नोंद घेऊन पुढील प्रवेश प्रक्रिया होणार आहे. या प्रवेशाचे ऑनलाइन अर्ज नोंदणीचे वेळापत्रक तंत्रशिक्षण संचालनालयाने प्रसिद्ध केले. अधिक माहितीसाठी ेंश्रि२५. वींशारहरीरिहींर.सीं.ळ प या वेबसाइटवर संपर्क साधावा. या ठिकाणी प्रवेशाविषयी सविस्तर माहिती देण्यात आली आहे. त्यानुसार अचूक पद्धतीने वेळेत अर्ज सादर करावे. तसेच दिलेल्या सूचनेनुसार राउंडमध्ये सहभागी व्हावे, असे असे आवाहन देखील करण्यात आले आहे. तंत्रज्ञानाची आवड असणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी दहावीनंतर तंत्र शिक्षणाची संधी उपलब्ध आहे. लवकर नोकरी आणि उज्ज्वल भविष्याची संधी असून, ज्या विद्यार्थ्यांनी नुकतीच दहावी परीक्षा उत्तीर्ण केली आहे अशांना अभियांत्रिकी व तंत्रज्ञान पदविका हा एक आकर्षक आणि प्रभावी मार्ग आहे. तांत्रिक पदविका केंद्रित आणि उद्योग-आधारित शिक्षण देते. पारंपरिक शाखांबरोबरच मेकॅट्रॉनिक्स अभियांत्रिकी, कृत्रिम बुद्धिमत्ता, डेटा सायन्ससारख्या शाखांचा समावेश असल्याने विद्यार्थ्यांना त्यामध्ये प्रवेशाची संधी असेल.

# शेगावीचा राणा पंढरीला निघाला...

## श्री संत गजानन महाराज पालखीचे बाळापूर तालुक्यात स्वागत

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३ बाळापूर अकोला**
श्री गजानन -जय गजानन, गण गण गणात बोते'चा जयघोष करत पारंपरिक बँड, टाळ मृदंगांच्या गजरात आषाढी एकादशीनिमित्त संत श्री गजानन महाराज पालखीचे सोमवारी शेगाव येथून अकोला जिल्ह्यात आगमन झाले. शेगावीचा राणा पंढरीला निघाला... वेशीपर्यंत भक्तीचा सागर लोटला, असे भाव जागृत करणारे दृश्य ही पायी वारी मार्गस्थ होताना दिसून आले. शेगाव येथील वेशीपासून नागझरीपर्यंत प्रचंड गर्दी होती. त्यानंतर अकोला जिल्ह्यातील वेशीवर भक्तांनी या पायी वारीचे स्वागत करत श्रींच्या पालखीचे दर्शन घेतले. गण गण गणांत बोते' च्या जयघोषाने कसुरा, मनारखेड, पारस परिसर दुमदुमून गेला.आषाढी वारी पंढरपूरसाठी श्री संत गजानन महाराजांच्या पालखीचे २ जून रोजी सकाळी शेगाव मंदिर येथून प्रस्थान झाले. श्री गजानन महाराज यांच्या पालखीचे हजारो भाविक भक्तिमय वातावरणात दर्शन घेत होते. मार्गावर रांगोळ्या काढण्यात आल्या होत्या. शिस्तबद्ध पद्धतीने पावली करत वारकरी माऊलीच्या भक्तीत दंग झाल्याचे दिसून आले. पालखी सोहळ्याचे बाळापूर तालुक्यात अनेक ठिकाणी स्वागत करत भाविकांनी श्रद्धेने उत्साहाने दर्शन घेतले. जिल्ह्यात ३७. ८ अंश तापमान असतानाही श्रींच्या दर्शनासाठी व डोळ्याचे पारणे फेडणारी पायी वारी डोळ्यात साठवण्यासाठी रस्त्याच्या दुतर्फा भाविकांनी मोठी गर्दी केल्याचे दिसून आले. संत गजानन महाराज यांच्या रजत मुखवट्याचे महिला व पुरुषांनी पूजन केले. तसेच पुष्पहार अर्पण करून दर्शन घेतले. पालखीत सहभागी वारकरी व भाविकांना ग्रामस्थांकडून थंड पाणी बॉटल, मठ्ठा, फराळ, अल्पोपाहार आणि शीतपेय वितरीत करण्यात आले. पालखी सोहळा शेगाव येथून मार्गस्थ होता बुलडाणा पोलिसां कडून बंदोबस्त तैनात करण्यात आला.आज भौरद येथे मुक्काम; बुधवारी होईल प्रस्थान श्रींची पालखी पारस येथून मंगळवारी निमकर्दा, गायगाव मार्गे भौरद येथे मुक्कामी येणार आहे. हा प्रवास ९ कि.मी. राहणार आहे. बुधवारी पालखी अकोलाकडे प्रस्थान करणार असून, डाबकी रोड, गांधी रोडवरुन मुंगीलाल बिजोरीया विद्यालयाच्या प्रांगणा वर मुक्कामी थांबणार आहे. त्यानंतर गुरुवारी पालखी गोरक्षण रोड, आदर्श कॉलनी, खदान परिसर, जिल्ह ाधिकारी कार्यालया समोरून खोलेश्वर, जयहिंद चौक, हरिहर पेठ येथील टाऊन हायस्कूलच्या मैदानावर मुक्काम राहिल. दोन्ही दिवसांचा प्रवास एकूण ८ कि.मी. राहणार आहे. शुक्रवारी पालखी पहाटेच भरतपूरकडे रवाना होणार आहे.



### उन्हातही भाविकांची दुतर्फा गर्दी

पंचक्रोशील ग्रामस्थांची गर्दी श्रींचा पालखी सोहळा नागझरी, कसुरा, मनारखेड, पारस परिसरात पोहोचला. या सर्व ठिकाणच्या पंचक्रोशीतील भाविक संत श्रेष्ठ गजानन महाराजांच्या दर्शनासाठी हार फुल घेऊन फाट्यावर उभे होते. पालखी थांबताच भाविकांनी पालखीचे दर्शन घेत होते. या मार्गावरुन दुचाकीने जाणारे वाहन बाजूला उभे करुन पादत्राणे रस्त्याच्या कडेला काढून श्रींच्या पालखीचे दर्शन घेत होते.

# अवैधरित्या विक्री होणारे २११ बॅग भरून खत जप्त

## सांगवी येथे कृषी व पोलिस विभागाची कारवाई

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३पुसद**
अवैधरित्या विक्री करण्यासाठी आणण्यात आलेल्या खताच्या तब्बल २११ बॅग जप्त करण्यात आल्या. तब्बल २ लाख ८८ हजार रुपये किमतीचा हा खताचा साठा जप्त करण्याची कारवाई पुसद तालुक्यातील सावंगी या गावी रविवार दि. १ जून रोजी दुपारी कृषी आणि पोलिस विभागाने संयुक्तरित्या केली. या कारवाईनंतर विनापरवाना खताची विक्री बेभमपणे सुरू असल्याची गंभीर बाब उघड झाली आहे.

या प्रकरणी सविस्तर असे की, तालुक्यातील सावंगी येथून पुसदमध्ये मोठ्या प्रमाणात अवैधरित्या खताची विक्री होत असल्याची प्राथमिक माहिती कृषी व पोलिस विभागाला मिळाली होती. त्यानंतर ट्रकमधून २११ बॅग खताची मोठ्या प्रमाणात अवैधरित्या व विनापरवाना गावात खुलेआम विक्री होत असल्याचे उघडकीस आले. सावंगी बान्सी मार्गे मंगरूळ तालुक्यातून पुसद तालुक्यातील सांवगी येथे श्री ओम साई फर्टिलायझरचे गुजरातच्या सुरत येथील कंपनीतून आलेले किसान गोल्ड व कृषिरत्न या नावाचे खत अनधिकृतपणे शेतकऱ्यांना विक्री करीता येत असल्याचे आढळून आले आहे.

विक्री करणाऱ्यांची माहिती प्रशासनास द्यावी जिल्हा कृषी अधिकारी डाबरे यांच्या मार्गदर्शनाखाली तालुका कृषी अधिकारी विजय मुकाडे, मोहीम अधिकारी प्रवीण जाधव, पंचायत समितीचे कृषी अधिकारी शंकर राठोड, तांत्रिक अधिकारी नितीन घाडगे, कृषी पर्यवेक्षक प्रफुल महेंद्र, कृषी सहाय्यक अंभोरे व नरवाडे यांच्या पथकाने सांगवी येथे २ लाख ८८ हजार ८८७ रूपये किंमतीच्या २११ खतांच्या बॅग जप्त केल्या आहेत.



# महावितरणच्या एसडीईच्या खुर्चीवर बेशरमचे झाड ठेवून निषेध

## वीजपुरवठा खंडित होत ग्रामस्थ असल्याने त्रस्त

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३ दर्यापूर थिलोरी**- तालुक्यातील थिलोरी येथे गेल्या कित्येक वर्षांपासून विद्युत पुरवठा नियमित व सुरळीत होत नाही. त्यामुळे चिडलेल्या ग्रामस्थांनी सोमवारी येथील उपविभागीय अभियंत्यांच्या (एसडीई) रिकाम्या खुर्चीवर बेशरमचे झाड ठेवून निषेध नोंदवला. दरम्यान आठवडाभरात थिलोरी येथील वीजपुरवठा सुरळीत न झाल्यास तीव्र स्वरूपाचे आंदोलन करण्यात येईल, असा इशारा आता ग्रामस्थांनी दिला आहे.

या अनोख्या आंदोलनामुळे महावितरणच्या कार्यक्षमतेवर प्रश्नचिन्ह लागले आहे. सध्या महावितरणचा सुरक्षा सप्ताह सुरू आहे. परंतु असे असताना या विभागाने जनतेची सुरक्षा मात्र वाऱ्यावर सोडली, असा संदेश या आंदोलनातून देण्यात आला. थिलोरी येथील वीज पुरवठा नियमित व्हावा म्हणून उपविभागीय



अभियंता कार्यालयास वारंवार निवेदने दिली. परंतु या निवेदनांची महावितरणाच्या अधिकाऱ्यांनी दखल न घेता त्यास केराची टोपली दाखवली, असा आंदोलनकर्त्यांचा आरोप आहे. उन्हाळ्यात वीज पुरवठा खंडित होत असल्याने याचा नाहक त्रास ग्रामस्थांना सोसावा लागला. आता पावसाळा सुरू होताच हलक्याशा वादळ-वाऱ्याने गावातील वीज पुरवठा तब्बल १० ते १२ तास खंडित होत आहे. यावरून हा विभाग किती गंभीरपणे काम करतो, याचा अंदाज येतो.

या सर्व बाबींमुळे संतप्त झालेल्या ग्रामस्थांनी थेट महावितरण कार्यालय गाठून कार्यालयाच्या आवारात ठिय्या आंदोलन केले. दरम्यान उपकार्यकारी अभियंता विक्रम काटोले वेळेवर हजर न झाल्याने ग्रामस्थांनी त्यांच्या रिकाम्या खुर्चीवर बेशरमचे झाड ठेवून निषेध केला. ग्रामीण भागात महावितरणच्या वतीने इलेक्ट्रिक पोलवर चिनीमातीचे डिश लावले आहेत. पावसाळ्यात ते लवकर खराब होतात. परिणामी वीज पुरवठा खंडित होत आहे. दर्यापूर येथून थिलोरीला वीज पुरवठा करावा सध्या आमला येथून थिलोरीला वीज पुरवठा होतो.

मात्र वीज पुरवठा हा आमला येथून न करता दर्यापूर येथून सुरू करावा अशी मागणीही ग्रामस्थांनी केली आहे. ग्रामस्थांच्या विविध मागण्यांसंदर्भात महावितरणचे कमालीचे दुर्लक्ष चालवले आहे. त्यामुळे नागरिकांनी संताप व्यक्त करत उपविभागीय अभियंत्यांच्या खुर्चीवर बेशरमचे झाड ठेवून वीज वितरण कंपनीच्या कारभाराचा निषेध नोंदवला. आंदोलनप्रसंगी थिलोरीवासी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# जिल्हा नियोजनचा निधी प्राधान्याने खर्च करावा-जिल्हाधिकारी आशिष येरेकर

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३ अमरावती**

जिल्ह्याच्या विकासासाठी जिल्हा नियोजनच्याच्या माध्यमातून निधी उपलब्ध करून देण्यात येतो. यावर्षी शिक्षण, आरोग्य आणि जलसंधारणाच्या कामांवर लक्ष केंद्रीत करण्यात येणार आहे. त्यामुळे सर्व यंत्रणांनी जिल्हा नियोजनचा निधी प्राधान्याने खर्च करावा, असे निर्देश जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांनी दिले.

जिल्हाधिकारी कार्यालयात आज जिल्हा नियोजन व विकास निधीच्या विनियोगाबाबत बैठक पार पडली. यावेळी मुख्य कार्यकारी अधिकारी संजिता महापात्र, उपवनसंरक्षक सुमंत सोळंखे, जिल्हा नियोजन अधिकारी वर्षा भाकरे आदी उपस्थित होते.


जिल्हाधिकारी श्री. येरेकर म्हणाले, जिल्ह्याच्या विकासासाठी पालकमंत्री यांनी निधीचा प्राधान्यक्रम ठरविला आहे. यावर्षी जिल्ह्यातील शिक्षणाचा दर्जा उंचावण्यासाठी निधी दिल जाणार आहे. यातून जिल्हा परिषद आणि महापालिकेच्या शाळांसाठी वर्ग खोल्या आणि इतर सुविधा निर्माण केल्या जाणार आहे. त्यासोबतच अंगणवाडीचा दर्जा उंचावण्यात



येणार आहे. आरोग्य व्यवस्था सुधारण्यासाठीच्या निधीतून प्राथमिक आरोग्य केंद्र ते जिल्हा रूग्णालयातील यंत्रणेचे बळकटीकरण करण्यात येणार आहे. येत्या काळात स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणूका असणार असल्याने तातडीने प्रशासकीय मान्यता घेऊन कामांना सुरवात करावी.अहिल्यादेवी होळकर यांच्या त्रिशताब्दी जन्म वर्षानिमित्त जलसंधारणाची कामे हाती घेण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. यावर्षी जुने जलसंधारणाची कामे शोधून त्यांची दुरूस्ती करण्यात येणार आहे. किरकोळ दुरूस्ती करून यात पाणी साठवण करण्यात येणार आहे. तसेच विंधन विहिरी घेऊन जलपूर्भरणाची कामे केली जातील. शेतकऱ्यांना शेतीसाठी वहिवाटीचा रस्ता व्हावा, यासाठी पांदण रस्ते तयार केले जातील. नाला खोलीकरणांतर्गत घेण्यात आलेल्या कामांमधून काढण्यात आलेली माती या रस्त्यांच्या कामांसाठी उपयोगात आणली जाणार आहे. तसेच ५ जूनपासून एक पेड माँ के नाम उपक्रम राबविण्यात येणार आहे. प्रशासनाच्या कामात सुधारणा करण्यासाठी कृती कार्यक्रम राबविण्यात येत आहे. यातून नागरिकांना घरपोच सुविधा मिळण्यासाठी प्रयत्न करावेत, असे निर्देश त्यांनी यावेळी दिले.बैठकीत पशूसंवर्धन, वन, सार्वजनिक बांधकाम, पाटबंधारे, शिक्षण, आरोग्य, कृषी आदी विभागांचा आढावा घेतला.

# यंदा व्यावसायिक अभ्यासक्रमांकडे कल; जागा कमी असल्याने स्पर्धा

## जिल्ह्यात ११ वीसाठी ४१,६०० तर आर्टच्या तब्बल १८ हजार जागा



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३अमरावती**

दहावीचा निकाल जाहीर झाल्यानंतर विद्यार्थी-पालकांचे लक्ष पुढील शिक्षणाच्या प्रवेशाकडे लागले आहे. अकरावी, अभियांत्रिकी डिप्लोमा तसेच आयटीआय या तिन्ही अभ्यासक्रमांसाठी प्रवेशासाठी अर्ज प्रक्रिया सुरू झाली. यंदा प्रथमच अकरावी ऑनलाइन प्रवेश प्रक्रिया ही जिल्ह्यात (ग्रामीण भागात) राबवली जात आहे. अकरावीच्या कला, विज्ञान, वाणिज्य या शाखा मिळून ४१ हजार १८० जागा आहेत. यामध्ये सर्वात जास्त १८ हजार ६० जागा कला शाखेच्या आहेत. मात्र, झटपट नोकरी, व्यवसाय उपलब्ध होत असल्याने मागील काही वर्षात व्यावसायिक अभ्यासक्रमांकडे विद्यार्थ्यांसह पालकांचा कल वाढला आहे. आयटीआय, पॉलिटेक्निककडे विद्यार्थ्यांचा कल अधिक असल्याचे दिसत आहे. मात्र, व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या जागा पुरेशा उपलब्ध नसल्याने विद्यार्थ्यांचा हिरमोड होतो, हेही तितकेच खरे आहे.

जिल्ह्यात यंदा जिल्ह्यात अकरावीच्या अनुदानित व विनाअनुदानित महाविद्यालयांत उपलब्ध जागांपेक्षा दहावी उत्तीर्ण विद्यार्थ्यांची संख्या जास्त आहे. त्यामुळे अकरावीला प्रवेशासाठी विद्यार्थी धावपळ करत आहे. यंदा संपूर्ण जिल्ह्यात विज्ञान शाखेच्या १७ हजार २६० जागा तर ५ हजार ८६० जागा वाणिज्य शाखेच्या आहे. वाणिज्य, विज्ञान शाखेचा पर्याय सोडला तर कला शाखेकडे अनेक प्रा. अरविंद मंगळे, अकरावी प्रवेश प्रक्रिया समन्वयक तथा शिक्षण तज्ज्ञ विद्यार्थ्यांनी पाठ फिरवल्याचे चित्र दरवर्षी रिक्त जागांच्या संख्येमुळे दिसून येते. याचवेळी तंत्रनिकेतन व आयटीआयचाही पर्याय विद्यार्थ्यांना उपलब्ध असला तरी अकरावीच्या तुलनेत यासाठी जागा कमी असल्याने अनेक विद्याथ्यर्थ्यांना अन्य अभ्यासक्रमाचा पर्याय शोधावा लागतो. ६ पॉलिटेक्निक महाविद्यालये आणि ३१ आयटीआय संस्थांमध्ये एकूण ८ हजार ४८ जागा आहेत. अशातच जिल्ह्यात मागील काही वर्षात विद्यार्थ्यांचा व्यावसायिक अभ्यासक्रमाकडे कल वाढला आहे. परिणामी जागा कमी असल्याने विद्यार्थ्यांमध्ये प्रवेशाची स्पर्धा वाढली आहे. व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या जागा वाढवून देण्यात याव्यात, अशी मागणी विद्यार्थी, पालकांनी केली आहे.

जिल्ह्यात ३१ आयटीआयमध्ये ६ हजार ५०० जागा उपलब्ध जिल्ह्यात १८ शासकीय व १४ खासगी, असे ३२ आयटीआय असून त्यांची प्रवेश क्षमता ६ हजार ५०० आहे. यात १४ खासगी संस्थेचे १६५६ तर १८ शासकीय आयटीआयमध्ये ४८०४ जागा आहेत.

जिल्ह्यात ६ पॉलिटेक्निक कॉलेजमध्ये १,५४८ जागा जिल्ह्यातील ६ पॉलिटेक्निक कॉलेजमध्ये संगणक, सिव्हिल, इलेक्ट्रिक, इन्फॉर्मेशन टेक्नॉलॉजी, केमिकल, प्लास्टिक पॉलिमर अशा विविध शाखांमध्ये १,५४८ प्रवेश क्षमता आहे.

# चांदूरबाजार येथे साडेआठ लाखांची घरफोडी

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३बेलोरा**

संपूर्ण कुटुंब लग्नाला गेल्याची संधी पाहून अज्ञात चोरट्याने घरफोडी करून ८ लाख ६५ हजारांचा ऐवज चोरून नेल्याची घटना धर्माळपुरा चांदूरबाजार येथे घडली.



मोहम्मद सादिक ऊर्फ छोटू रहमतुल्ला असे फिर्यादीचे नाव आहे. त्यांचे कुटुंब २१ मे रोजी घराला कुलूप लावून लग्नाला गेले होते. २ जून रोजी ते गावावरून घरी परत आले असता त्यांना घराच्या दाराचे कुलूप तुटलेले दिसले. त्यांनी घरात जावून पाहिले असता सज्जावरील स्टीलच्या ड्रममध्ये ठेवलेले सोन्याचे दागिने व नगदी चार लाख वीस हजार रुपये असा एकूण आठ लाख ६५ हजार रुपयांचा ऐवज चोरट्याने चोरून नेल्याचे त्यांना दिसून आले. मोहम्मद सादिक यांच्या मुलीचे लग्न असल्यामुळे त्यांनी पैसे व सोन्याचे दागिने जपून ठेवले होते. ते अज्ञात चोरट्याने चोरून नेले. या घटनेची तक्रार त्यांनी चांदूरबाजार पोलिसस्टेशनला दाखल केली असता प्रभारी ठाणेदार कृष्ण पांडे यांनी घटनेचे गांभीर्य पाहून तत्काळ वरिष्ठांना माहिती दिली. त्यानंतर अचलपूरचे एसडीपीओ यांनी घटनास्थळाला भेट दिली व माहिती घेतली, तसेच ग्रामीण गुन्हेशाखेची चमू व डॉगस्कॉड, फिंगरप्रिंट एक्स्पर्टने घटनास्थळी जावून निरीक्षण केले. घटनेचा पुढील तपास प्रभारी ठाणेदार कृष्ण पांडे, पीएसआय विनोद इंगळे, नितीन डोगरे, रेखा चव्हाण, कोमल पांडे करीत आहेत.

# ‘पुष्पा, कुलरचा शॉक वीज चोरी’वर पथनाट्य...

## महावितरणकडून आयोजित चित्रकला स्पर्धेला चिमुकल्यांचा मिळाला उत्स्फूर्त प्रतिसाद



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३अमरावती**

दर्यापूर उपविभागात महावितरण कंपनीच्या कर्मचाऱ्यांनी पुष्पा, कुलरचा शॉक आणि वीज चोरी या पथनाट्याच्या माध्यमातून विद्युत अपघात, त्याचे परिणाम आणि निर्माण होणारी कौटुंबिक परिस्थितीची जाणीव करून देत विद्युत ग्राहकांना सर्वप्रथम विद्युत सुरक्षेला प्राधान्य देण्याचे आवाहन करण्यात आले. या माध्यमातून विद्युत सुरक्षेविषयी जागर करण्यात आला आहे.

मागील काही वर्षात महावितरण कर्मचाऱ्यांचे अपघात कमी करण्याला महावितरणला यश आले आहे. परंतू जनतेचे तसेच विशेषत: लहान मुलांचे विद्युत शॉक लागून अपघात होऊ नये, यासाठी महावितरण कंपनीच्या २० व्या वर्धापन दिनानिमित्त विद्युत सुरक्षा सप्ताहाचे आयोजन केले आहे. जिल्ह्यात वीज सुरक्षेबाबत जनजागृती करण्यासाठी चित्रकला स्पर्धा, पथनाट्य आणि २३ उपविभागात बाजाराच्या तसेच गर्दीच्या परिसरात विद्युत सुरक्षेचा जागर करण्यात येत आहे. अचलपूरचे कार्यकारी अभियंता प्रदीप अंधारे यांच्या मार्गदर्शनात दर्यापूर उपविभागात हे कार्यक्रम घेण्यात आले. तसेच धारणी तालुक्यातील अतिदुर्गम भागातील बिजूधावडी ग्रा. पं.च्या आवारात ग्रामस्थांना विद्युत सुरक्षेबद्दल माहिती देत गाव अपघात शून्य करण्यासाठी ग्रामस्थांनी सहकार्य करावे, असे आवाहन करण्यात आले.

कार्यकारी अभियंता प्रदीप अंधारे विजयकुमार कासट यांच्या पुढाकारातून मोर्शी विभागांतर्गत शेंदुरजना घाट शहर, जरुड, हातुर्णा आणि गाडेगाव येथे वीज ग्राहकांमध्ये विद्युत सुरक्षेबाबत जागर करण्यात आला. कार्यकारी अभियंता अमरावती शहर राजेश घाटोळे यांच्या मार्गदर्शनात अमरावती शहराअंतर्गत विशेषत: एमआयडीसी आणि उपविभाग १ आणि २ मध्ये वीज ग्राहकांना विद्युत सुरक्षेची माहिती देण्यात आली. अमरावती ग्रामीण विभागातही कार्यकारी अभियंता प्रफुल्ल लांडे यांच्या पुढाकारातून विविध कार्यक्रमाचे आयोजन करून वीज ग्राहकांना वीज अपघात कसे टाळावे याबाबत माहिती देण्यात आली.

४८ चिमुकल्यांनी स्पर्धेमध्ये रेखाटले चित्र महावितरणच्या चांदूर बाजार उपविभागाद्वारे आयोजित केलेल्या विद्युत सुरक्षा चित्रकला स्पर्धेला चिमुकल्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला आहे. जवळा उपकेंद्र परिसरात घेण्यात आलेल्या या स्पर्धेत ४८ मुलांनी सहभाग नोंदवला.

# प्रेमी युगुलाचा आत्महत्येचा प्रयत्न : विष घेण्यापूर्वी मोठ्या भावाला फोन केल्याने दोघेही बचावले : रुग्णालयात उपचार सुरू

**विदर्भ प्रजासत्ताक दि.३ वरुड**

वरुड तालुक्यातील गणेशपूर येथे एका प्रेमी युगुलाने आत्महत्येचा प्रयत्न केला. गणेशपूर येथील शेत शिवारात विष प्राशन करुन त्यांनी हे टोकाचे पाऊल उचलले. विष प्राशन करण्यापूर्वी तरुणाने त्याच्या मोठ्या भावाला फोन करुन संभाव्य कृतीची कल्पना दिली होती. त्यामुळे त्याने लगेच घटनास्थळ गाठून दोघांनाही रुग्णालयात दाखल केले.




पोलिसांच्या माहितीनुसार, मध्य प्रदेशातील मोहगाव हवेली येथील अल्पवयीन युवती व मोवाड येथील युवक ३१ मे रोजी सकाळी घरून पळून गेले. त्यानंतर गणेशपूर शेत शिवारातील एका शेतात विष प्राशन करून त्या दोघांनी आत्महत्येचा प्रयत्न केला. ही बाब काही वेळातच काहींच्या लक्षात आली, त्यामुळे त्यांना गंभीर अवस्थेत नागपूर येथे पुढील उपचारार्थ पाठविण्यात आले आहे.

प्राप्त माहितीनुसार, आई- वडील घरी नसल्याचे पाहून सदर मुलगी ३ दिवसापूर्वीच कोणालाही काही न सांगता घरून निघून गेली. आई वडील घरी आल्यानंतर सायंकाळी त्यांना मुलगी घरात दिसत नसल्याने त्यांनी तिचा सर्वत्र शोध घेतला, मात्र ती कोठेच आढळून आली नसल्याने अखेर त्यांनी मध्य प्रदेशातील मोहगाव हवेली पोलिस स्टेशन गाठून तक्रार नोंदवली होती. त्यानुसार मध्य प्रदेश पोलिसांनी अज्ञात आरोपीविरुद्ध अपहरणाचा गुन्हा दाखल करीत शोध सुरु केला होता. पुढे ती युवती मामे भावासोबत पळून गेल्याचे निष्पन्न झाले.

दरम्यान शनिवारी ३१ मे रोजी सकाळच्या सुमारास मोहगाव हवेली येथील १७ वर्षीय अल्पवयीन युवती व मोवाड येथील २२ वर्षीय युवक या प्रेमी युगुलाने गणेशपूर शेत शिवारातील शरद बांद्रे यांचे शेत गाठून तेथे विष प्राशन करून आत्महत्या करण्याचा प्रयत्न केल्याचे स्पष्ट झाले. दरम्यान युवकाने या घटनेची माहिती आधीच मोठ्या भावाला दूरध्वनीवरून दिली होती. त्यामुळे त्याने घटनास्थळ गाठून दोघांना तातडीने प्रथम मोवाड प्राथमिक आरोग्य केंद्रात, तेथून नरखेड ग्रामीण रुग्णालयात व त्यानंतर पुढील उपचारार्थ नागपुर येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयात दाखल केले. सध्या दोघांची प्रकृती स्थिर असल्याचे सांगण्यात येते. सदर प्रकरणाचा पुढील तपास वरूड पोलिस स्टेशनचे ठाणेदार अर्जुन ठोसरे यांचे मार्गदर्शनाखाली जमादार दिलीप राऊत करीत आहे.

# येत्या तीन महिन्यात प्राण्यांची गणना करणार-जिल्हाधिकारी आशिष येरेकर

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३अमरावती**

जिल्ह्यातील पशूधनाची अचूक माहिती व्हावी, यासाठी येत्या तीन महिन्यात प्राण्यांची गणना करण्यात येणार आहे. तसेच प्राण्यांचे टॅगींग करण्यात येणार आहे, अशी माहिती जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांनी दिली.

आज जिल्हाधिकाीर कार्यालयात प्राणीक्लेश समितीची सभा पार पडली. यावेळी जिल्हा अधिक्षक पोलिस अधिकारी विशाल आनंद, पोलिस उपायुक्त



सागर पाटील यांच्यासह समितीचे सदस्य आदी उपस्थित होते.

जिल्हाधिकारी श्री. येरेकर यांनी जिल्ह्यातील पशू गणनेची माहिती घेतली. पशूधन वाढविण्यासाठी सर्वकष प्रयत्न करण्यात यावे. तसेच येत्या पावसाळ्याच्या कालावधीत जनावरांना आजाराची लागण होऊ नये, यासाठी लसीकरण तसेच खबरदारी घेण्यात यावी. येत्या बकरी ईदच्या पार्श्वभूमीवर गोवंशाची तस्करी होऊ नये, यासाठी जिल्ह्यात आठ ठिकाणी तपासणी नाके उभारण्यात आले आहे. गोवंशाची वाहतूक होऊ नये, यासाठी परिवहन विभागानेही दक्ष राहावे. तसेच गोवंशाची अवैध वाहतूक होत असल्यास त्याची माहिती पोलिसांना द्यावी. पोलिस विभागातर्फे योग्य कार्यवाही करण्यात येईल.

बकरी ईदला गोवंशाचा बळी टाळावा, असे आवाहन जिल्हाधिकारी यांनी केले. बकरी ईदला प्राण्यांचा बळी देण्यात येतात. मात्र यावर्षी बकरी ईदला गोवंशाचा बळी देण्याचे टाळावे. गोवंशाचा बळी देणे कायद्याने गुन्हा असून असे प्रकार आढळून आल्यास कडक कारवाई करण्यात येईल. गोवंशाचा बळी देऊ नये, यासाठी जनजागृती करावी, तसेच कायद्याची माहिती नागरिकांना द्यावी. येत्या काळात जनावरांची खरेदी विक्री होत असलेल्या ठिकाणी लक्ष ठेऊन ही विक्री नियमाप्रमाणेच होण्यासाठी संबंधितांना निर्देश देण्यात येतील, असेही जिल्हाधिकारी श्री. येरेकर यांनी दिले.

# छत्री तलाव परिसरामध्ये दीड तास श्रमदान; मनपाच्या ३० अधिकारी, कर्मचाऱ्यांनी अर्धा ट्रक कचऱ्याची लावली विल्हेवाट

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३अमरावती**

शहराचे सौंदर्यस्थळ म्हणून ख्यात असलेल्या छत्री तलाव परिसरात सोमवारी मनपाच्या वतीने स्वच्छता अभियान राबवण्यात आले. मनपा आयुक्त सचिन कलंत्रे आणि अतिरिक्त आयुक्त महेश देशमुख यांच्या नेतृत्वात राबवण्यात आलेल्या या अभियानात ३० अधिकारी, कर्मचाऱ्यांनी सहभाग घेतला.



सुमारे दीड तास चाललेल्या श्रमदानातून परिसरातील अर्धा ट्रक कचऱ्याची विल्हेवाट लावण्यात आली. छत्री तलाव हे अमरावतीकरांसाठी हक्काचे पर्यटन स्थळ आहे. या भागात केवळ अमरावतीकरांसह त्यांच्याकडे येणाऱ्या पाहुण्यांनाही फेरफटका मारायला नेले जाते. तलावाच्या अवती-भोवती सुंदर असा निसर्गरम्य परिसर असल्याने पर्यटकांची या भागाला प्रथम पसंती आहे. स्वाभाविकच या भागात ये-जा करणाऱ्यांकडून परिसरात नकळत कचरा टाकला जातो.

हा कचरा पर्यटनासाठी आलेल्यांनी सोबत आणलेले खायचे पदार्थ, वेगवेगळ्या वेष्टनात गुंडाळून आणलेले स्नॅक्स, पिण्याच्या पाण्याच्या बाटल्या, प्लास्टिकच्या कॅरी बॅग आदी प्रकारचा असतो. वस्तूत: पर्यटकांनी असे वागू नये, हे अभिप्रेत आहे. परंतु तरीही या परिसरात कचरा टाकला जातो. असा अर्ध ट्रक कचरा मनपाच्या स्वच्छता दूतांनी सोमवारी दुपारपर्यंत स्वच्छता अभियान राबवून तेथून हटवला. गोळा केलेला कचरा फ्रेजरपुरा स्थित स्मशानभूमीनजीकच्या डम्पिंग ग्राउंडवर नेऊन टाकला. मनपाच्या झोन क्रमांक ३ चे वरिष्ठ स्वास्थ्य निरीक्षक कुंदन हडाले व प्लास्टिक जप्ती मोहिमेचे नोडल अधिकारी विकी जेधे यांनी या मोहिमेचे नेतृत्व केले. या मोहिमेत स्वास्थ्य निरीक्षक मनीष हडाले, योगेश कंडारे, मनीष नकवाल, धर्मेंद्र डिके, नीलेश तंबोले, संजय माहुरकर, नितीन वाघमारे यांच्यासह ३० हून अधिक स्वच्छता दूतांनी सहभाग नोंदवला.

वडाळी तलावाचीही लवकरच स्वच्छता आगामी काळात वडाळी तलावाचीही स्वच्छता केली जाणार आहे. छत्री तलावाप्रमाणेच वडाळी तलावाच्या परिसरातही पर्यटकांच्या हातून नकळत कचरा फैलावला जातो. त्यामुळे येत्या काही दिवसांत तेथेही अशीच स्वच्छता मोहीम राबवली जाईल, असे मनपाचे वरिष्ठ स्वास्थ्य निरीक्षक कुंदन हडोले यांनी सांगितले.

# गुटखा तस्करांची खैर नाही.. मुख्य सूत्रधाराला अटक होईपर्यंत सुरू राहणार कारवाई - पोलीस आयुक्त

**विदर्भ प्रजासत्ताक दि.३अमरावती**

अमरावती शहर पोलीसआयुक्त अरविंद चावरिया यांच्या आदेशावरून शहर पोलिसांनी धाडी टाकून लाखो रुपयांचा गुटखा जप्त व आरोपींना अटकेचे सत्र सुरू केलेले आहे. परंतु अद्याही मुख्य सूत्रधार अटक झालेला नाही. मुख्य सूत्रधार अटक गुटखा होईपर्यंत विक्री करणाऱ्यांवर कारवाई सुरू राहणार, असे पोलीस आयुक्त अरविंद यांनी चावरिया सांगितले.



शहरात गुटखा विक्रीचा व्यवसाय सर्रास सुरू असून प्रत्येक पान टपरीवर खुलेआम गुटखा मिळतो. याआधीसुध्दा शहर पोलिसांनी गुटखा तस्कारांवर कारवाई केली. परंतु अद्यापही मुख्य गुटखा तस्कार पोलिसांच्या हाती लागलेले नाही. त्यामुळे पोलिसांच्या कारवाईवर वेळोवेळी प्रश्न चिन्ह निर्माण होत आहे.गुन्हेशाखेच्या पथकाने चार दिवसाआधी रामपुरी कॅम्पमध्ये केशवाणीच्या घरी धाड टाकून १० लाखांचा गुटखा जप्त केला. तसेच पोलीस कस्टडीत असताना केशवाणी यांनी शेरूचे नाव पोलिसांना सांगितले.गुटखा तस्करांची खैर नाही.त्या आधारावर पोलिसांनी वलगाव हद्दीतून १२.५० लाखाचा गुटखा जप्त केला. मात्र हा गुटखा कोणाचा आहे, याबाबत अद्यापही त्याने पोलिसांना काही सांगितले नाही. मुख्य गुटखा तस्कर केव्हा गजाआड होणार याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

# प्रतिबंधित बोगस बियाणे विक्रीचा सुळसुळाट
## पश्चिम विदर्भात १२ ठिकाणी कारवाई

विदर्भ प्रजासत्ताक
दि.३अमरावती




खरीप हंगामाच्या तोंडावर बियाणे खरेदीची लगबग सुरु झाली आहे. यातच प्रतिबंधित असलेल्या बोगस बियाणे विक्रीचा देखील सुळसुळाट पाहण्यास मिळत आहे. या पार्श्वभूमीवर पश्चिम विदर्भात एचटीबीटी प्रतिबंधित असलेल्या बोगस कपाशी बियाणांचा मोठा साठा आढळून आला आहे. गेल्या तीन आठवड्यांत विविध पथकांनी १२ ठिकाणी धाडी टाकून कारवाई करण्यात आली आहे. तर यात मोठे रॅकेट असण्याची शक्यता देखील वर्तविली जात आहे.

खरीप हंगाम तोंडावर असल्याने बियाणे विक्रीसाठी दाखल झाले आहेत. शेतकऱ्यांकडून खरेदीला देखील सुरवात करण्यात आली आहे. मात्र काही ठिकाणी प्रतिबंधीत असलेल्या एचटीबीटी कापसाचे बोगस बियाणे विक्रीसाठी आणले जात आहे. यातून शेतकऱ्यांची फसवणूक होत असल्याचे समोर आले आहे. या अनुषंगाने पश्चिम विदर्भात मोठी कारवाई केली जात आहे.

### ६२ लाखाचे बोगस बियाणे जप्त

मागील तीन आठवड्यात १२ ठिकाणी छापेमारी करत कारवाई करण्यात आली आहे. या ठिकाणाहून तब्बल ४ हजार ४२९ बियाणांची पाकिटे व ८०० किलो खुले बियाणे जप्त करण्यात आले आहे. त्यांची एकूण किंमत ६२ लाख रुपये इतकी आहे. या प्रकरणात पोलिसांनी संबंधित प्रकरणांमध्ये एफआयआर नोंदवले आहेत. या बोगस बियाणांचे धागेदोरे गुजरात व प्रामुख्याने अहमदाबाद परिसराशी जुळलेले आहेत.

दरम्यान गुजरात राज्यातून बोगस बियाणे येतं त्यामुळे त्याच्या पाठीमागे कोण आहे? गुन्हे दाखल होतो, मात्र त्याचा मुख्य सूत्रधार कोण आहे? खऱ्या पोलिसांपर्यंत पोलीस का पोहोचत नाही? पोलिसांनी याचा आका शोधणे गरजेचे आहे. कारण ही बियाण्याची कंपनी गुजरातच्या कोण्या बड्या नेत्याची आहे का? असा सवाल अमरावती जिल्ह्याचे खासदार बळवंत वानखडे यांनी केला, त्यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडवणीस व व कृषी मंत्री माणिकराव कोकाटे यांना पत्र लिहिले आहे, शेतकऱ्यांना फसवणाऱ्या गुजरातच्या कंपनीवर कडक कारवाई करा अशी मागणी आता जोर धरू लागली आहे.

# पाकिस्तानाची सीमा ओलांडण्यासाठी नागपूरच्या महिलेने केला गुगल मॅप्सचा वापर

विदर्भ प्रजासत्ताक
दि.३नागपूर




भारत पाकिस्तान दरम्यान युध्द स्थिती निर्माण झाली असताना भारताची नियंत्रण रेषा ओलांडून पाकिस्तान मध्ये गेलेल्या नागपूरकर सुनिता जामगडे हिने तेथे जाण्यासाठी गुगल मॅप्सचा वापर केला होता.

गेल्या महिन्यात कारगिलमधील हुंडरमन गावातून नियंत्रण रेषा (एलओसी) ओलांडून नागपूरमधील ४३ वर्षीय सुनीता जमगडे पाकिस्तान मध्ये गेली होती. पाकिस्तानने तिला भारताच्या स्वाधीन केल्यावर तिला पोलिसांनी अटक केली. तिने चौकशीदरम्यान पोलिसांना सांगितले की, पाकिस्तानमध्ये प्रवेश करण्यासाठी तिने गुगल मॅप्सचा वापर केला. मोठ्या प्रमाणात वापरल्या जाणाऱ्या नेव्हिगेशन प्लॅटफॉर्ममुळे तिला सीमेपलीकडे जाण्याचा मार्ग सापडला.

कपिल नगर पोलिस स्टेशनचे निरीक्षक सतीश आडे यांनी सांगितले की, सुनीता यांच्या डिव्हाइसवर एक संशयास्पद मोबाइल ॲप्लिकेशन इन्स्टॉल केलेले आढळले. सध्या तरी, हे ॲप उघडलेले नाही, कारण तपासकर्त्यांना त्याचा उद्देश किंवा संभाव्य धोके याबद्दल खात्री नाही. फोन फॉरेन्सिक विश्लेषणासाठी पाठवण्यात आला आहे आणि पोलिस डिव्हाइसमध्ये चिप बसवण्यात आली आहे का ते देखील तपासत आहेत. चौकशीदरम्यान सुनीता मानसिकदृष्ट्या अस्थिर असल्याचे अधिकाऱ्यांनी नमूद केले, ती अनेकदा विचारलेल्या प्रश्नांशी संबंधित नसलेली उत्तरे देत असे.

तिच्या १२ वर्षांच्या मुलालाही नागपूरला आणण्यात आले आहे आणि सध्या तो बाल कल्याण समितीच्या देखरेखीखाली आहे. पोलिसांनी त्याचा जबाब नोंदवला आहे. मुलाने सांगितले की कुटुंब यापूर्वी सुट्ट्यांसाठी भूतान आणि नेपाळला गेले होते. चौकशीदरम्यान सुनीताने आग्रह धरला की तिला त्या सहलींसाठी व्हिसाची आवश्यकता नाही आणि म्हणूनच पाकिस्तानलाही तेच लागू होईल असे तिने गृहीत धरले. सुनीताला न्यायालयीन कोठडीत हलवण्यात आले आहे.

# ७ जूनपर्यंत पावसाची विश्रांती!

विदर्भ प्रजासत्ताक
दि.३अमरावती



जिल्ह्यात मान्सूनपूर्व पावसानेशेतकऱ्यांची दाणादाण उडवून दिली आहे. कधी नव्हे एवढा पाऊस मे महिन्यात अनुभवायला आला. उन्हाळी हंगाम मान्सूनपूर्व पावसाने संकटात सापडला आहे. शेतीची कामे प्रभावित ठरली आहेत. मात्र हवामान तज्ज्ञांनी उद्यापासून पाऊस उघडीप घेणार असा अंदाज पुरविल्याने शेतीची कामे आटोपायला नक्कीच मदत होणार आहे.

कोरडवाहू शेतकऱ्यांनी मान्सूनपूर्व पावसाचा अंदाज घेऊन पेरणीचे नियोजनकरावे. ज्यांच्याकडे पाण्याची उपलब्धता आहे अशा शेतकऱ्यांनीही मान्सूनचा अंदाज घेऊनच पुढचे पाऊल टाकावे. याचे कारणही असेच आहे की, एप्रिल महिना खूपच तापला. त्यामुळे पाणी पातळीत मोठी घट अनुभवायला मिळाली. ती तूट भरून काढण्यासाठी निसर्गाचा अंदाज अर्थात मान्सूनचा अंदाज घेऊन पेरणीचे नियोजन करावे.

# शैक्षणिक कागदपत्रांसाठी सेतू केंद्रावर झुंबड
## सर्वर डाऊनमुळे विद्यार्थ्यांना शैक्षणिक दाखल्यासाठी राहावे लागते ताटकळत




विदर्भ प्रजासत्ताक
दि.३चांदुर बाजार

नुकतेच दहावी-बारावीचे लागल्याने निकाल शैक्षणिक कागदपत्रासाठी जुळवाजुळव करून ऑनलाईन दाखले मिळवण्यासाठी सेतू केंद्रात विद्यार्थ्यांची मोठ्या प्रमाणात झुंबड दिसून येत आहेः मात्र वारंवार सर्वर डाऊन होत असल्यामुळे सेतू केंद्रात येणाऱ्या विद्यार्थ्यांना व ग्रामीण भागातील पालकांना ताटकळत उभे राहावे लागत आहे. त्यामुळे सर्वर डाऊनचा प्रश्न निकाली काढावा, अशी मागणी सेतू केंद्रात येणाऱ्या नागरिकांकडून केल्या जात आहे.

तालुक्यात पुरवठा विभागात शिधापत्रिका मोहीम राबविण्यात येत आहे. याकरिता रेशनकार्ड धारकांकडून उत्पन्नाच्या दाखल्याकरिता गर्दी होताना दिसत आहे. तसेच नुकताच लागलेल्या दहावी-बारावीचा निकाल लागल्याने विद्यार्थ्यांना शैक्षणिक दाखले मिळावे यासाठी विद्यार्थ्यांची तसेच पालकांची लगबग वाढली आहे त्यामुळे सेतू केंद्रात मोठी गर्दी होत आहे.

दहावी-बारावीत उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांना पुढील शैक्षणिक अभ्यासक्रमासाठी तसेच विविध शासकीय कामांसाठी कागदपत्रांची आवश्यकता भासते. त्यासाठी विद्यार्थी व पालकांची लगबग सेतू सुविधा केंद्राकडे येताना दिसत आहे. अनेक विद्यार्थ्यांना शैक्षणिक अभ्यासक्रमाची माहिती, जातीचे प्रमाणपत्र, उत्पन्नाचे दाखले, डोमेसिअल प्रमाणपत्र, नॉन क्रिमिलेयर, रहिवासी दाखले या सर्व प्रमाणपत्रांची गरज भासत आहे.

# ४०० पोलिस अंमलदारांकडून बदलीसाठी 'विनंती'! एसपींकडे पोहोचले प्रस्ताव

विदर्भ प्रजासत्ताक
दि.३अमरावती

## या आठवड्यात १०० अंमलदारांच्या बदल्या




अमरावती जिल्हा ग्रामीण पोलिस दलातील पोलिस अंमलदारांची (पीसी टू एसआय) बदली प्रक्रिया या आठवख्यात राबविली जाणार आहे. त्यात एकाच ठाण्यात पाच वर्षांचा कार्यकाळ पूर्ण करणारे बदलीपात्र असे १०० पोलिस अंमलदार आहेत. त्यांची प्रशासकीय बदली केली जाणार आहे. तर जिल्ह्यातील विविध पोलिस स्टेशन व अन्य शाखांमध्ये कार्यरत ४०० च्या आसपास अंमलदारांनी बदलीसाठी पोलिस अधीक्षकांकडे विनंती अर्ज दिले आहेत. त्यात बहुतांश अंमलदारांनी अमरावती उपविभागाला पसंती दर्शविली आहे. तर अनेकांना परतवाडा व तरूद्र ठाण्याचा पर्याय दिला आहे. बदली इच्छुक ४०० अंमलदारांपैकी पोलिस अधीक्षक नेमक्या किती जणांच्या 'विनंती'ला मान देतात, त्याकडे खाकीचे लक्ष लागले आहे.पोलिस घटकातील बदलीपात्र अंमलदारांच्या प्रशासकीय बदल्या ३५ में पूर्वी कराव्यात, अशा सूचना डीजी कार्यालयाकडून देण्यात आल्या होत्या. मात्र, पोलिस अधीक्षक विशाल आनंद है आधी प्रशिक्षणाला व नंतर रजेवर असल्याने ही बदली प्रक्रिया आता जूनच्या पहिल्या आठवड्यात राबविली जाणार आहे. त्यासाठी बदलीपात्र पोलिस अंमलदारांची यादी अंतिम करण्यात आली आहे. तर सुमारे ४०० अंमलदारांनी विनंती बदलीसाठी अर्ज केल्याची माहिती एसपी विशाल आनंद यांनी दिली. विनंती बदलीसाठी इच्छुक असलेल्या अंमलदारांशी 'वन टु वन' संवाद साधल्यानंतर किती जणांची विनंती बदली करायची, ते ठरविले जाणार आहे. शहरापासून नजीक लोणी, आसेगाव, माहुली जहांगीर आणि मंगरूळ चव्हाळा सारख्या अमरावती उपविभागातील ठाण्यात जाण्यासह बहुतांश जणांचे अर्ज हे वरुड, परतवाडा ठाण्यासाठी आले असल्याची माहिती एसपी विशाल आनंद यांनी दिली.

### एकाच ठिकाणी असणारे अंमलदारही बदलणार

वारंवार एकाच पोलिस स्टेशनमध्ये, जिल्हा मुख्यालयातील शाखांमध्ये पोस्टिंग मिळविणारे वा बदलीस्थळी रूजू होऊन अल्पावधीतच जुन्या ठिकाणी परतणारे एसपीच्या रडारवर आले आहेत. अशा अंमलदारांची वर्कशीट व सर्व्हिस शीट पाहून पुढील निर्णय घेतला जाणार आहे. नव्या दमाच्या पोलिस अंमलदारांना एलसीबी, वाहतूक शाखेत संधी देण्याचे सुतोवाच एसपी विशाल आनंद यांनी केले आहे.

# बफर स्टॉकमुळे यंदा 'डीएपी' चा तुटवडा : रॅक होताहेत गोदामात जमा




विदर्भ प्रजासत्ताक
दि.३अमरावती

टंचाई काळात संरक्षित खतांच्या साठ्याचा वापर करता यावा, यासाठी सर्वाधिक मागणी असलेल्या युरिया व डीएपीचा बफर स्टॉक केला जातो. त्यासाठी जिल्ह्यात लागलेल्या रॅकमधील डीएपी सध्या बफर स्टॉकमध्ये जमा होत आहे. अशा परिस्थितीत डीएपीचा फक्त दोन हजार मे. टन साठा आहे. त्यामुळे खरिपासाठी नियोजित पुरवठा वेळेवर न झाल्यास डीएपीची टंचाई उद्भवण्याची शक्यता आहे.

यंदाच्या खरीप हंगामासाठी१,४३,६६८ मे. टन रासायनिक खते मंजूर आहेत. यामध्ये डीएपी २१,२४४ मे. टन खताचा समावेश आहे. त्या तुलनेत पुरवठा कमी होत आहे. शिवाय जिल्ह्यात आलेले खत बफर स्टॉकसाठी गोदामात जमा करण्यात येत असल्याने सध्या २०२७ मे. टन साठा विक्रीसाठी उपलब्ध आहे. पाऊस पडल्यानंतर पेरणीच्या काळात रासायनिक खतांची मागणी वाढते. शिवाय पिकांच्या वाढीच्या काळातही युरिया व डीएपीची जास्त मागणी होते. अशा परिस्थितीत यंदा डीएपीचा तुटवडा निर्माण होण्याची शक्यता आहे.

### टंचाई स्थितीसाठी केला जातो संरक्षित साठा

यावर्षी एमएआयडीसीद्वारा २०२० मे. टन युरिया व व्हीसीएमएफद्वारा १७३० मे. टन डीएपी असा एकूण ३७५० मे. टन. खतांचा संरक्षित साठा करण्यात येत असल्याची कृषी विभागाची माहिती आहे. जिल्ह्यात टंचाईच्या काळात जिल्हाधिकारी यांच्या परवानगीने हा स्टॉक बाहेर काढल्या जातो.

### खरीप हंगामासाठी डीएपी खताची सद्यस्थिती

जिल्ह्यात एप्रिल व मे महिन्यांसाठी २१२४४ मे. टन डीएपीचे आवंटन आहे. याच कालावधीत ५०२९ मे. टन पुरवठ्याचे नियोजन आहे. त्या तुलनेत ६७९ मे. टन डीएपीचा पुरवठा जिल्ह्यात झालेला आहे. मार्चअखेर ३५१६ मे. टन साठा ३१ मार्चपूर्वी शिल्लक होता. असा एकूण ४१९५ साठा उपलब्ध आहे. आतापर्यंत २१५८ मे. टन विक्री झाल्याने सध्या २०३७ मे. टन डीएपी शिल्लक आहे.

# श्री संत गुलाबराव महाराजांच्या साहित्यावर संशोधकास विद्यापीठातर्फे आर्थिक साहाय्य

विदर्भ प्रजासत्ताक
दि.३अमरावती

संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाद्वारे दानदाते वासुदेवराव राजारामजी देशमुख यांच्याकडून प्राप्त झालेल्या दाननिधीमधून श्री संत गुलाबराव महाराजांचे जीवन, साहित्य, विचार, तत्त्वज्ञान, शिक्षण व कवितेवर विद्यापीठात आचार्य पदवीकरिता संशोधन करणाऱ्या एका संशोधकास प्रतिवर्ष ६हजार रु. याप्रमाणे दोन वर्ष एकूण रू. १२ हजार रु. संशोधन आर्थिक साहाय्य प्रदान करण्यात येते.शैक्षणिक वर्ष २०२५-२६ व २०२६-२७ करिता सदरआर्थिक साहाय्य एका संशोधकास प्रदान करावयाचे आहे. विद्यापीठात संशोधन करणाऱ्या संशोधकानी विहित नमुन्यात आवेदनपत्रे ३० जून, २०२५ पर्यंत सादर करावयाची आहे.आवेदनपत्राचा विहित नमुना व इतर तपशील विद्यापीठाच्या वित्त विभागात निःशुल्क उपलब्ध असून सदर आर्थिक साहाय्याचा संशोधकांनी लाभ घ्यावा, असे आवाहन वित्त व लेखा अधिकारी सीए पुष्कर देशपांडे यांनी केले आहे. अधिक माहितीकरिता यांच्याशी प्रत्यक्ष अथवा दूध्वनी क्र. ९८८१४६५५६७ यावर संपर्क साधता येईल, असे विद्यापीठाच्यावतीने कळविण्यात येत आहे.

# इर्विनमधील २० खाटांचा 'आयसीयू' चे काम अंतिम टप्यात : आठवडाभरात रुग्णांच्या सेवेत होणार दाखल

विदर्भ प्रजासत्ताक दि.३अमरावती

जिल्हा सामान्य रुग्णालयातील वॉर्ड क्र. ८ मध्ये २० खाटांचे आयसीयू विभागाचे काम मागील दीड वर्षापासून सुरू होते. या विभागाचे काम सार्वजनिक बांधकाम विभागाकडून पूर्ण झाल्याचे सांगण्यात येत आहे. त्यामुळे येत्या आठवडाभरात रुग्णांच्या सेवेत येथील आयसीयू कार्यान्वित करण्यात येणार आहे. त्याअनुषंगाने हालचालींना वेग आला आहे.

जिल्हा सामान्य रुग्णालयात रोज शेकडो रुग्ण उपचारासाठी दाखल होतात. ग्रामीण भागातील रुग्णालयांतून अनेक गंभीर रुग्ण या ठिकाणी उपचारासाठी रेफर केले जातात. परंतु, जिल्हा सामान्य रुग्णालयात केवळ ६ आयसीयू बेड असल्याने अनेक गंभीर रुग्णांना आयसीयूची गरज असताना वेळेत आयसीयू बेड मिळत नसल्याने त्यांना नागपूर येथे रेफर केले जाते. तसेच खाटा कमी पडल्यास रुग्णांना त्रासदायक ठरते. तसेच रुग्णांच्या नातेवाइकांची धावपळ होते. अशातच जिल्हा रुग्णालय हे शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाच्या ताब्यात गेल्याने, येथे वॉर्ड क्र. ८ मध्ये २० खाटांचे आयसीयू विभाग सुरू करण्याचे काम मागील दीड वर्षापासून सुरू आहे. त्यामुळे मागील दीड




वर्षांपासून हा वॉर्ड रुग्णांसाठी बंदच आहे. अशातच सार्वजनिक बांधकाम विभागाकडून या आयसीयू विभागाचे काम पूर्ण झाले आहे. परंतु, रुग्णालय स्तरावरच ते कार्यान्वित नव्हते. अशातच रुग्णालयातील गंभीर रुग्णांचा वाढता ताण लक्षात घेता हा आयसीयू विभाग सुरू करण्याच्या हालचाली सुरू झाल्या आहेत. हा विभाग सुरू होण्यासाठी विविध पक्ष संघटनांनी आंदोलनही केले होते. तसेच बेमुदत उपोषणाचा इशारा देण्यात आला होता.

## आठवडाभरात होणार सुरू

आयसीयू विभागाचे काम पूर्ण झाले आहे. केवळ जनरेटर सिस्टिम त्याला जोडणे बाकी आहे. तसेच आवश्यक बेड व मनुष्यबळासाठी अधिष्ठातांकडे मागणी केली आहे. या आठवडाभरात ते सुरू होणार आहे.

**-डॉ. दिलीप सौंदळे,**
**जिल्हा शल्यचिकित्सक**

मात्र, आठवडाभरात २० खाटांचा आयसीयू विभाग कार्यान्वित होत आहे. त्यामुळे आरोग्य सेवेत आणखी भर पडली आहे.

जिल्हा रुग्णालय शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाच्या ताब्यात जाणार असल्याने २० खाटांचा आयसीयू विभाग सुरू करण्यासाठी वैद्यकीय महाविद्यालयाचे अधिष्ठाता डॉ. किशोर इंगोले यांच्याकडे आवश्यक बेड तसेच या ठिकाणी आवश्यक स्टाफ नर्स, इतर कर्मचारी तसेच सुरक्षा रक्षकांची मागणी करण्यात आल्याचे रुग्णालय प्रशासनाचे म्हणणे आहे.

